




# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ७० ■ अंक क्र.३१ ■ सोमवार २ नोव्हेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26



**डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध**

गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार **दि.०२ नोव्हेंबर ते ०७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत. स.१० ते २ दु.**

संपर्क :- **डॉ.गौतम शाह M.S.** (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३) भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८


### इंडिया आघाडीच्या रॅलीत वीस पक्ष एकवटले

# निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमारांचा मतचोरीचा कट लोकसभा निवडणूकच अवैध ठरते : राहुल गांधी

**नवी दिल्ली, दि.१ : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी मतचोरीचा कट रचला. त्यातून त्यांनी या देशाच्या लोकशाहीचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी केलेल्या कृत्याची चौकशी होणार आणि जेलमध्ये जावेच लागणार. ज्ञानेशकुमार यांनी सत्ताधाऱ्यांसोबत पध्दतशीरपणे कट रचत २०२४ च्या लोकसभा निवडणूकीनंतर तेरा कोटी ५० लाख मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. दर सात मतांच्या मागे एक मतदाराचे नाव वगळण्यात आले आहे.**



**त्यामुळे २०२४ ची लोकसभा निवडणूकच अवैध आहे. निवडणूक आयोगाची मतांची आकडेवारीच त्याला आधार देते, असा दावा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. दिल्लीतील रामलीला मैदानावर इंडिया आघाडी तर्फे केंद्र सरकार आणि निवडणूक आयोग विरोधात रॅली काढण्यात आली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी आणि मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनाला विरोध करण्यासाठी या आंदोलनात तब्बल वीस विरोधी पक्ष सहभागी झाले. सुमारे चार तास चाललेल्या या रॅलीत राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे, ममता बॅनर्जी, अखिलेश यादव, तेजस्वी यादव यांच्यासह अनेक प्रमुख नेत्यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली.**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्यावर मतचोरीचा कट रचल्याचा आरोप केला. ते म्हणाले, ज्ञानेशकुमार यांनी देशाच्या लोकशाहीचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या **(पान ४ वर)**

## गृहमंत्री पांडू हवालदार सपकाळांचा घणाघात

मुंबई, दि.१ : दिल्लीतील रामलीला मैदानावरील काँग्रेसच्या रॅलीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चीनकडून फंडिंग होत असल्याचा आरोप केल्यानंतर महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांनी त्यांच्यावर जोरदार पलटवार केला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी फडणवीस यांच्यावर टीका करताना, मुख्यमंत्री म्हणून तुम्ही घाशीराम कोतवाल आहात आणि गृहमंत्री म्हणून पांडू हवालदार आहात, अशा शब्दांत निशाणा साधला. महाराष्ट्रात अराजकता शिगेला पोहोचली असून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनल्याचा आरोपही त्यांनी केला.

**चीन फंडिंगचे पुरावे द्या**

रामलीला मैदानावरील आंदोलनाला चीनकडून फंडिंग होत असल्याच्या **(पान ४ वर)**

# राजकीय स्वार्थासाठी शीख नरसंहारातील शहीदांचे काँग्रेसला विस्मरण : जे.पी.नड्डा

**नवी दिल्ली, दि.१ : इंडिया आघाडीच्या रामलीला मैदानावरील रॅलीच्या विरोधात भाजपने आज (दि.१) दिल्लीसह देशभरात लोकशाही बचाव, अराजकता हटाओ मार्च काढला. या आंदोलनाच्या माध्यमातून भाजपने काँग्रेस आणि राहुल गांधी यांच्यावर जोरदार निशाणा साधला. एक नोव्हेंबर १९८४ रोजी झालेल्या शीख विरोधी हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर याच दिवशी काँग्रेसने रॅली आयोजित केल्याचा आरोप भाजपने केला. दिल्लीमध्ये हरीनगर ते तिलकनगर दरम्यान सुमारे एक किलोमीटरचा मार्च काढण्यात आला. या मार्चमध्ये भाजप नेत्यांसह १९८४ मधील शीखविरोधी दंगलीतील पीडित कुटुंबीय आणि शीख समुदायातील नागरिक सहभागी झाले होते. यावेळी भाजप नेत्यांनी काळ्या फिती बांधून काँग्रेसविरोधात निषेध व्यक्त केला.**

केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी राहुल गांधी यांच्यावर टीका केली. नड्डा म्हणाले, एक नोव्हेंबर हा दिवस १९८४ मधील शीखविरोधी हिंसाचाराच्या पीडितांचे स्मरण करण्याचा आहे. मात्र, राहुल गांधी यांनी पीडितांना विसरून रामलीला मैदानावरील रॅलीच्या माध्यमातून स्वतःचे राजकारण चमकवण्याचा प्रयत्न केला. या दिवशी त्यांनी शीख समाजाची माफी मागायला हवी होती, असेही नड्डा म्हणाले.

विदेशी शक्तींच्या टूलकीट प्रमाणे काम

हरियाणातील रोहतक येथे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी मोर्चाचे नेतृत्व केले. यावेळी त्यांनी काँग्रेसवर मतचोरीचा आरोप केला. मतचोरी ही काँग्रेसची परंपरा असून, हा पक्ष जनतेच्या मतदानाचा अपमान करत असल्याची टीका त्यांनी केली. राहुल गांधी विदेशी शक्तींच्या टूलकीट प्रमाणे काम करत असून, परदेशी शक्तींच्या इशाऱ्यावर देशाच्या लोकशाहीला आव्हान देण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही नबीन यांनी केला. देशातील १४० कोटी जनता सर्व घडामोडींवर लक्ष ठेवून आहे, असे ते म्हणाले.

काँग्रेसने जनादेशाचा अपमान केला

नितीन नबीन यांनी विरोधकांवर निशाणा साधताना म्हटले की, **(पान ४ वर)**

# कर्जासाठी बोरीसला शेतकऱ्याचा टोकाचा निर्णय सेंट्रल बँकेच्या प्रवेशदारात गळफासचा प्रयत्न

**धुळे, दि. १ : पीक कर्ज मिळवण्यासाठी तब्बल तीन महिने बँकेचे उंबरठे झिजवूनही पदरी निराशा आली. त्यामुळे शेतकऱ्याने बँकेच्या प्रवेशद्वारावरच गळफास घेण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना धुळे जिल्ह्यातील बोरीस येथे घडली. सुदैवाने यावेळी उपस्थित असलेल्या खातेदारांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने मोठा अनर्थ टळला. हिरालाल उत्तम माळी (वय ४४, रा. चिंचवार) असे या शेतकऱ्याचे नाव आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, हिरालाल माळी यांनी पीक कर्जासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या बोरीस शाखेत आवश्यक कागदपत्रे सादर केली होती. मात्र, सर्व कागदपत्रांची पूर्तता करून तीन महिन्यांपासून बँकेत चकरा मारल्या. तरीही कर्ज मंजूर होत नसल्याने ते मानसिकदृष्ट्या हतबल झाले होते. अखेर या विलंबाला कंटाळून त्यांनी आज बँकेच्या प्रवेशद्वारावरच गळफास घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, बँकेत उपस्थित असलेल्या बुरझड, निकुंभे आणि बोरीस येथील खातेदारांनी प्रसंगावधान राखत तातडीने हस्तक्षेप केला. त्यामुळे हिरालाल माळी यांचे प्राण वाचले. या घटनेनंतर बँकेच्या कामकाजाबाबत आणि कर्मचाऱ्यांच्या वागणुकीबाबत खातेदारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

**मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनाचा दाखला**

घटनेनंतर प्रतिक्रिया देताना हिरालाल माळी यांनी व्यथा मांडल्या. माझी काही चूक असेल तर माझ्यावर कारवाई करा. मी त्यासाठी तयार आहे. मात्र, बँकेची चूक असेल तर शासनाने संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी **(पान ४ वर)**

## तलावात बुडून एकाचा मृत्यू

धुळे दि.१: बोरविहीर (ता. धुळे) शिवारात शेतातील तलावात बुडून एकाचा मृत्यू झाला. ईश्वर मगन बाविस्कर (वय ४१, रा. पुरमेपाडा ता. धुळे) असे त्यांचे नाव आहे. घरी परत न आल्याने नातेवाईकांकडून त्यांचा शोध सुरू होता, शोध घेत असताना शनिवारी साडेबाराच्या सुमारास ईश्वर बाविस्कर तलावात पाण्यात बुडालेले दिसले. नातेवाईक ग्रामस्थांनी बाहेर काढून त्यांना श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली. हवालदार मनोज शिरसाठ तपास करीत आहेत.

# धुळे लॉ लायब्ररीची निवडणूक संपन्न अध्यक्ष सुर्यवंशी तीन मतांनी विजयी

**धुळे दि.१- डिस्ट्रिक्ट लॉ लायब्ररीच्या बहुप्रतीक्षित आणि चुरशीच्या निवडणुकीचे निकाल जाहीर झाले असून, एकूण १,०४४ मतदार असलेल्या या निवडणुकीत कायदेशीर क्षेत्रातील उत्साह आणि लोकशाही मूल्यांचे सुंदर दर्शन घडले.**



मतदान प्रक्रिया शांततेत पार पडल्यानंतर जाहीर झालेल्या निकालांनुसार चेअरमनपदी ॲड.जगदीश गंगाधर सूर्यवंशी हे ३४१ मते मिळवून अतिशय अटीतटीच्या लढतीत ३ मतांनी विजयी झाले आहेत (यात संजय शिंपी यांना ३३८ तर जितेंद्र निळे यांना ८९ मते मिळाली). तसेच व्हाइस चेअरमनपदी ड. दिनेश वसंतराव गायकवाड यांनी ४३५ मते मिळवून विजय संपादन केला असून त्यांचे प्रतिस्पर्धी राहुल देसले-पाटील यांना ३३२ मते मिळाली. याशिवाय सेक्रेटरीपदाच्या दोन जागांसाठी झालेल्या अटीतटीच्या लढतीत ॲड. समीर सुभाष सोनवणे यांनी ४७२ मते आणि ॲड. नितेश वाल्मिक बोरसे यांनी ५२१ मते मिळवून दणदणीत विजय मिळवला (नितीन गवळी यांना ४२२ मते मिळाली).

यानिवडणुकीतसर्वसमावेशक कार्यकारिणी सदस्य म्हणून ॲड. अमोल भिमराव पाटील, ॲड. गजानन आनंदा माळी, ॲड. महेश प्रकाश मराठे, ॲड. प्रभाकर हरि वाघ, ॲड. सागर रविंद्र तापकिरे, ॲड. शशिकांत किसन पवार, ॲड. संयम सचिन कापडिया, ॲड. प्रथमेश प्रमोदकुमार दीक्षित आणि ॲड. जयेश संजय बाविस्कर यांची निवड झाली आहे. तसेच महिला कार्यकारिणी सदस्य म्हणून ॲड. अश्विनी सुभाष कर्णे आणि ॲड. वंदना विजय मोरे यांनी मान पटकावला आहे.

## कारमधून चार मोबाईल लंपास

धुळे दि.१: आर्वी (ता. धुळे) शिवारात असलेल्या कारमधून चोरट्यांनी ४५ हजार रुपयांचे चार मोबाईल चोरुन नेले. मनोज दत्तात्रय ताडकर ( रा. चाकण, पुणे) यांच्यासह काहीजण वाहनाने उज्जैनकडे (म.प्रदेश) जात होते. आर्वी शिवारात हॉटेल चक्रधरच्या पुढे त्यांनी कार लावलेली होती. शनिवारी पहाटेपूर्वी एकच्या सुमारास चोरट्यांनी कारचा दरवाजा उघडून मनोज ताडकर, सोबत असलेले बाळासाहेब सातपुते, मित्र संदीप राठोड यांचे चार मोबाईल चोरट्यांनी काढून नेले. ४५ हजार रुपये मोबाईलची किंमत आहे. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात शनिवारी रात्री उशिरा चोरीचा गुन्हा दाखल झाला.

# बडतर्फ पोलीस उपनिरीक्षकानेच रचला होता स्टेट बँक दरोड्याचा कट

**जळगाव, दि. १ : जळगाव तालुक्यातील भोकर येथे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेवर बंदुकीचा धाक दाखवत गोळीबार करून तब्बल २७ किलो सोने आणि साडेबारा लाख रुपयांची रोकड लुट प्रकरणाचा मुख्य सूत्रधार चक्क बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक असल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. विशेष म्हणजे, या उपनिरीक्षकाने तुरुंगात असतानाच दरोड्याचा कट रचल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी पोलिसांनी चार आरोपींना मुद्देमालासह अटक केली आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शंकर जसक हा पोलीस उपनिरीक्षक २०२३ मध्ये जळगाव शहरातील शनिपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या बँक दरोड्याच्या प्रकरणात दोषी आढळला होता. त्यानंतर पोलीस विभागाने त्याला सेवेतून बडतर्फ केले होते. तेव्हापासून तो कारागृहात होता. कारागृहात असताना त्याची खुनासारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपी गजानन पवार याच्याशी ओळख झाली. पुढे या दोघांनी मिळून बँक दरोड्याचा कट **(पान ४ वर)**

## छडवेल कोर्डे येथे घरफोडी

धुळे दि.१ : छडवेल (कोर्डे) (ता साक्री, धुळे) येथील उर्मिलाबाई विठठल सुर्यवंशी (वय ५५) यांच्या घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा कुलुप तोडला. घरातील मुख्य खोलीतील कपाट फोडले. लॉकर तोडुन सोने व चांदीचे दागिने लंपास केले. सोन्याची अंगठी, सोन्याचे मनी मंगळसुत्र व किलु, चांदीचे पैंजण असा एकुण ३० हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केला. शनिवारी पहाटे घरफोडीचा प्रकार उघडकीस आला याप्रकरणी उर्मिलाबाई सूर्यवंशी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार रात्री उशिरा निजामपुर पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल झाला.

# आदिवासी गुर्जर बंजारांच्या लोकपरंपरा जतन करण्यासाठी साहित्य सम्मेलन

**नंदुरबार दि.१ (प्रतिनिधी) : लोकसाहित्य, आदिवासी लोकसंस्कृती, गुर्जर, बंजारा लोकपरंपरा आणि अहिराणी भाषेचा समृद्ध वारसा जतन करण्याच्या उद्देशाने नंदुरबार येथे बुधवार, दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी नांदी साहित्य संमेलन अर्थात जिल्हा लोक साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री जी सार्वजनिक वाचनालय, महाराष्ट्र साहित्य परिषद, नंदुरबार आणि साहित्य भारती, नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन घेण्यात येत आहे.**

**कन्यादान मंगल कार्यालयात**

कै. शालिनीताई नटावदकर नगरीत ४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत संमेलन होणार आहे. संमेलनाध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांची निवड करण्यात आली असून, पद्मश्री चैत्राम पवार यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. प्रदीप निफाडकर उपस्थित राहणार आहेत.

संमेलनाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप, साहित्य भारती महाराष्ट्र प्रदेशचे कार्याध्यक्ष शशिकांत घासकडबी , महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभाग कार्यवाह प्राचार्य डॉ. संजीव गिरासे, प्रा. डॉ. वासुदेव वले आणि गणेश आढाव यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

उद्घाटनानंतर लोककला व साहित्य संवर्धन, लोकगीत, अहिराणी गीते, आदिवासी लोकसंस्कृती, काव्यवाचन आणि साहित्यिक विचारमंथन अशा विविध विषयांवर कार्यक्रम होणार आहेत. परिसंवाद, कवी संमेलन आणि समारोप अशा स्वरूपात दिवसभर साहित्यिक मेजवानी रसिकांना अनुभवता येणार आहे. संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी डॉ. सुहास नटावदकर, अध्यक्षपदी मसापचे नंदुरबार अध्यक्ष डॉ. शिवाजीराव पाटील, तर साहित्य भारतीचे **(पान ४ वर)**

### अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे आवाहन

# दिवाळी प्रकाशाचा आणि आनंदाचा क्षण पर्यावरणपूरक पध्दतीने साजरा करावा

**नंदुरबार दि.१ (प्रतिनिधी) : दिवाळी हा प्रकाशाचा आणि आनंदाचा सण आहे. हा सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करून आरोग्य आणि पर्यावरणाचे रक्षण करावे, असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. गेल्या ३० वर्षांपासून समिती शाळा-महाविद्यालये आणि विविध सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून फटाकेमुक्त दिवाळी हा उपक्रम राबवीत आहे.**

फटाके हे दिवाळीचे पारंपरिक अंग नसून त्यांचा धर्म आणि संस्कृतीशी कोणताही संबंध नाही. फटाक्यांचा शोध चीनमध्ये लागला होता. सुरुवातीला वन्य प्राण्यांना पळवून लावण्यासाठी त्यांचा वापर केला जात असे. फटाक्यांमध्ये शिसे, बेरियम, कॅडमियम, स्ट्रॉन्शियम आणि ॲंटिमनी यांसारखे घातक रासायनिक घटक वापरले जातात. त्यामुळे निर्माण होणाऱ्या विषारी धुरामुळे वायुप्रदूषण वाढते. याचा परिणाम **(पान ४ वर)**



# आ.अमरिशभाई पटेलाच्या उपस्थितीत शिंगावेला संगीतमय कार्यक्रम संपन्न

**शिरपूर दि.१: तालुक्यातील शिंगावे येथील मातोश्री कॉलनी नर्मदेश्वर महादेव मंदिर येथे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त आयोजित करण्यात आलेला चंद्र आहे साक्षीला हा संगीतमय कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.**

महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री तथा विधान परिषद आमदार अमरिशभाई पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. या कार्यक्रमाला शिंगावे व कॉलनी परिसरातील नागरिकांनी प्रचंड संख्येने उपस्थिती लावली.

शिक्षण आणि संस्कार हीच उज्ज्वल भविष्याची गुरुकिल्ली : आ. अमरिशभाई पटेल :

यावेळी उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना आमदार अमरिशभाई पटेल यांनी शिरपूर तालुक्याच्या विकास प्रवासाचा आढावा घेतला. तालुक्यात मोठ्या प्रमाणावर बंधारे बांधून जलसंधारणाची कामे करण्यात आली असून, त्यामुळे शेतकऱ्यांना नवसंजीवनी मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच तालुक्यात शिक्षणाचे जाळे विस्तारल्यामुळे आज येथील अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन परदेशात तसेच मोठ्या महानगरांमध्ये चांगल्या वेतनाच्या नोकऱ्यांमध्ये कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याबाबत मार्गदर्शन करताना भाईंनी पालकांना आपल्या मुलांना चांगले शिक्षण देण्याबरोबरच उत्तम संस्कार देण्याचे आवाहन केले. शिक्षणाच्या माध्यमातून पुढील पिढी सक्षम झाली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. याशिवाय, शिरपूर विमानतळाच्या विस्तारीकरणाचे काम सुरू असल्याचा उल्लेख करत आगामी काळात मोठ्या एमआयडीसी सह टेक्सटाईल पार्कची निर्मिती करण्याची योजनाही त्यांनी यावेळी मांडली. या विकासकामांमुळे भविष्यात परिसरात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शिंगावे व कॉलनी परिसरातील नागरिकांनी या कार्यक्रमाला दिलेला प्रचंड प्रतिसाद पाहून आमदार अमरिशभाई पटेल भारावून गेले. त्यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधत निवांतपणे मार्गदर्शन केले. नागरिकांचा उत्साह आणि मोठ्या संख्येने झालेली उपस्थिती यामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

या कार्यक्रमाचे आयोजन माजी पंचायत समिती सदस्य चंद्रकांत पाटील, माजी सरपंच रमाकांत पाटील, शिंगावे गावाचे माजी उपसरपंच तथा आरोग्यसेवक चंद्रकांत लोटन **(पान ४ वर)**



## संत कबीर दुसऱ्या हिंदी अवृत्तीचे प्रकाशन संपन्न

साक्री दि.१ (प्रतिनिधी):- -येथील सेवानिवृत्त सहाय्यक पशुधन विकास अधिकारी तथा कवी,लेखक डॉ दिलीप लोखंडे कबिराकार वाङ्मय सचिव मूलनिवासी सभ्यता संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या लोक संवादक संत कबीरहिंदी दुसरी आवृत्ती चे प्रकाशन मूलनिवासी सभ्यता संघाची राष्ट्रीय वाङ्मय संगीति, शिवाजी नगर, पुणे येथे आयोजित कार्यक्रमात प्रसिद्ध साहित्यिक डॉ. अशोक राणा, डॉ.राजेंद्र कुंभार, शामसुंदर मिरजकर, हिम्मत वैद्य, रश्मी डोंगरे **(पान ४ वर)**

# पुण्याहून धुळे व नंदुरबारसाठी ज्यादा बसेस वल्लभनगर येथून सूटणार

**धुळे दि.१ : पुणे शहर व परिसरात वास्तव्यास असलेल्या खान्देशातील प्रवाशांना धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील आपल्या गावी जाण्यासाठी प्रवासादरम्यान होणारी गैरसोय टाळता यावी, यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या धुळे विभागातर्फे विशेष नियोजन करण्यात आले आहे. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन वल्लभनगर (पिंपरी चिंचवड) बसस्थानकातून जादा एस.टी. बसेसचे आयोजन करण्यात आले आहे.**



या अंतर्गत दि. ४ नोव्हेंबर ते ७ नोव्हेंबर रोजी वल्लभनगर येथून धुळे, साक्री, नंदुरबार, शहादा, शिरपूर, शिंदखेडा, अक्कलकुवा, दोंडाईचा व नवापूर साठी जादा बसेस सुटतील. या जादा बसेसचा लाभ घेण्यासाठी प्रवाशांनी एस.टी. महामंडळाच्या अधिकृत ऑनलाइन रिझर्व्हेशन पद्धारे तिकीट आरक्षित करताना विशेष काळजी घेण्याचे आवाहन धुळे विभागातर्फे करण्यात आले आहे. आरक्षण करताना SOURCE (प्रस्थान ठिकाण) म्हणून CNWD आणि इच्छित गंतव्यस्थळासाठी संबंधित आगाराचे नाव निवडणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, धुळ्याला जाणाऱ्या प्रवाशांनी CNWD-DHULE असा पर्याय निवडून आरक्षण करावे. दरम्यान, प्रवाशांना आरक्षण तसेच प्रवासासंदर्भात कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी शिवाजीनगर (वाकडेवाडी), नाशिक फाटा आणि वल्लभनगर बसस्थानक येथे पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रवाशांना आवश्यक मार्गदर्शन व मदत करण्याची जबाबदारी या कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहे. ऑनलाइन आरक्षण करताना किंवा **(पान ४ वर)**

## क्षुल्लक कारणाने युवकाचा खून

नंदुरबार दि.१ (प्रतिनिधी) : धडगाव तालुक्यातील रोपमाळ परिसरात २३ वर्षीय तरुणाचा हत्याराने मारहाण करून खून केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी धडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, योगेश सुकलाल पावरा (वय २३, रा. धानखेडीपाडा, रोषमाळ, ता. धडगाव, जि. नंदुरबार) हा तरुण शेलकुई येथील सुनील सुकलाल पावरा यांच्या घरी गेला होता. एवढ्या **(पान २ वर)**

# देवरे अभियांत्रिकी मधे आय.इ.टी.ई स्टुडंट फोरम,विद्यार्थी मंचाचा शुभारंभ

**धुळे दि.१:- श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजीराव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयातील ईलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागांतर्गत आय ई टी ई स्टुडंट्स फोरम या विद्यार्थी मंचाचा शुभारंभ व दोन दिवसांच्या ई एस पी हँड्स-ऑन कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते त्यात विभागातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ हितेंद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत या स्टुडंट्स फोरम चा शुभारंभ करण्यात आला. या दोन दिवसाच्या कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना आधुनिक एम्बीडेड सिस्टीम्स, मायक्रोकॅंट्रोलर आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज या तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक ज्ञान देणे हा होता. आय ई टी ई स्टुडंट्स फोरम च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञानासोबतच संशोधन, नव संकल्पना, प्रकल्पनिर्मिती आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मायक्रोकॅंट्रोलरचे कार्य, त्याचे प्रोग्रामिंग, विविध इलेक्ट्रॉनिक घटकांशी इंटरफेसिंग तसेच प्रत्यक्ष प्रकल्पनिर्मितीची माहिती तज्ञ प्रशिक्षक यांनी दिली. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना सैद्धांतिक ज्ञानासोबत प्रत्यक्ष प्रयोग करण्याची संधी उपलब्ध झाली. या कार्यशाळेच्या शुभारंभ प्रसंगी ई अँड टीसी विभागप्रमुख डॉ पी एस पाटील, मेकॅनिकल विभागप्रमुख डॉ एस डी सूर्यवंशी, ईलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख प्रा डॉ विनोद शिंदे, सिव्हिल विभागप्रमुख प्रा डॉ जितेंद्र व्यास, कॉम्प्युटर विभागप्रमुख प्रा डॉ इंद्रभान एस. बोरसे, अप्लाइड सायन्स विभाग प्रमुख प्रा डॉ अभिजीत मोरे, रजिस्ट्रार प्रा मोहन पवार यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच ईलेक्ट्रोसॉफ्ट सिस्टीम्स जळगाव येथील **(पान ४ वर)**

## सावऱ्यादिगर येथे वनराई बंधारा

धडगाव, दि.१ (प्रतिनिधी)- तालुक्यातील बिलगाव (प्रा.) वनक्षेत्रातील भुषा परिमंडळातील नियतक्षेत्र सावऱ्या येथील कक्ष क्रमांक ४४ मौजे सावऱ्या दिगर यात वनविभाग व स्थानिक ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने श्रमदानातून वनराई बंधारा बांधण्यात आला.

यावेळी दगड, माती, वाळू नाल्यात आणून १५ मीटर लांबीचा बंधारा बांधण्यात आला. यंदा पावसाळा अत्यल्प झाल्याने स्थानिक नदी, नाले आटण्यास सुरुवात होऊ लागली आहे. त्यामुळे आता जे नाले जीवंत आहेत त्यातील पाणी वनराई बंधारे बांधून पाणी अडविले पाहीजे या हेतूने वनविभागाने सदर कार्यक्रम हाती घेतला असून श्रमदानातून वनराई बंधारे व पाणवठे बांधून वन्यप्राणी, **(पान ३ वर)**


**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -1,27,900 रु.+3% GST

सोने- 24 K -1,39,000 रु.+3% GST

चांदी- 1,85,500 रु.+3% GST

तारगल्ली, सराफ बाजार, धुळे

फोन नं.२३३१०३/२३४१०३



ॐ श्री संतोषी माता प्रसन्न ॐ

**।। जाहिर आमंत्रण ।।**

**।। श्री संतोषी माता मंदिर वार्षिक उत्सव ।।**

**दि.२, ३, ४, नोव्हें, सोम, मंगळ, बुधवार, अश्वीन वद्य अष्टमी नवमी दशमी असा साजरा होत आहे.**

**कार्यक्रम-: दि.२ नोहेंबर सोमवार, अश्विन वद्य अष्टमी श्री संतोषी मातेच्या मूर्तीची मिरवणूक संध्याकाळी ५ ते १० सुरुवात. संध्याकाळी. ५ वा. मंदिरापासून जिल्हा रुग्णालय कडून, जिल्हा परिषद कार्यालय कलेक्टर ऑफिस कडून झाशी राणी पुतळा, राणा प्रताप चौक, फुलवाला चौक आगारोड, गांधी पुतळा नगरपट्टी कडून जुने अमळनेर स्टॅण्ड, ६ वी गल्ली पुढे जे.बी. रोडने शहर पोलीस चौकी, बॉम्बे लॉज पर्यंत तेथून प्रविण फोटोज कडून मंदिराकडे सोबत मुलींचे गरबा नृत्ये**

**दि.३/११/२०२६ मंगळवार आश्विन वद्य नवमी सकाळी ९ ते १२ मंदिराच्या आवारात होम हवन, पुर्णाहुती प्रसाद**

**दि.४/११/२६ अश्विन वद्य नवमी बुधवार दुपारी १२ वा. मंदिराचा आवारात भंडारा वाटप**

**तरी भाविकांनी उपस्थित राहावे सहकार्य करावे.**

**श्री.संतोषी माता मंदिर ट्रस्ट, धुळे**

# आपला महाराष्ट्र

## धुळ्याचा औद्योगिक विकास आणि वास्तव

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताची अर्थव्यवस्था कशी असावी, यासंदर्भात तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि अर्थतज्ज्ञांनी एक पथदर्शक चौकट तयार केली होती. त्यामध्ये मिश्र अर्थव्यवस्थेवर भर देण्यात आला होता. शेती आणि शेतीपूरक उद्योगांना प्रोत्साहन देण्याबरोबरच देशाच्या गरजेनुसार जड उद्योगांची उभारणी करण्यात आली. या औद्योगिक धोरणातून निर्माण झालेल्या अर्थव्यवस्थेने विषमता कमी करण्यास आणि सामान्य जनतेचे जीवनमान उंचावण्यास हातभार लावला.

कालांतराने लोकसंख्या वाढली, शहरे विस्तारली आणि शहरी विकासासाठी जमिनीच्या संपादनाचे प्रमाणही वाढले. त्याचबरोबर औद्योगिक वसाहती निर्माण झाल्या, कारखाने सुरू झाले आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. ज्या शहरांमध्ये औद्योगिक वातावरण निर्माण झाले आणि नागरिकांची मानसिकता उद्योगपूरक बनली, त्या ठिकाणी उद्योगांची वाढ झाली. मात्र, सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे आणि बाजारपेठेतील वाढत्या स्पर्धेमुळे लघुउद्योगांना मोठा फटका बसला. अनेक उद्योग बंद पडले.दुसरीकडे, अन्नप्रक्रिया उद्योगाला (फूड इंडस्ट्री) बहर आला असला, तरी या क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपन्यांना अधिक वाव मिळत आहे. परिणामी, स्वयंरोजगारावर आधारित उद्योग आणि मध्यम स्वरूपाचे उद्योग अडचणीत येऊ लागले आहेत. शेतीला दुय्यम स्थान मिळाल्याने शेतीवर आधारित उद्योगांचे भवितव्यही टांगणीला लागले आहे.

अशा परिस्थितीत जड उद्योग आणि मोठ्या भांडवलदारांचे बिगरशेती उद्योग किती काळ तग धरू शकतील, हा यक्षप्रश्न आहे. पोलाद, सिमेंट, वीट, माती, रेती, रंग, इलेक्ट्रॉनिक व इलेक्ट्रिकल उत्पादने, पाण्याचा व्यापार आणि कापड उद्योग यांसारख्या क्षेत्रांतील उत्पादनांना बाजारपेठ कोण उपलब्ध करून देणार? सामान्य ग्रामीण जनतेचीच बाजारपेठेतील क्रयशक्ती कमी झाली, तर ही उत्पादने खरेदी कोण करणार? सध्या वाहन उद्योग तेजीत असला, तरी त्यालाही काही मर्यादा आहेत. त्यामुळे भविष्यात अनेक उद्योग बंद पडण्याची किंवा अन्यत्र स्थलांतरित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ही सर्व पार्श्वभूमी मांडण्याचे कारण म्हणजे धुळे शहर आणि जिल्ह्यातील औद्योगिक परिस्थिती. औद्योगिक विकासाला पोषक वातावरण नसताना विस्तारित औद्योगिक क्षेत्रासाठी महसूल विभागाने एमआयडीसीला उपलब्ध करून दिलेली जमीन आणि त्यातून दाखविले जात असलेले विकासाचे स्वप्न यांचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधींनी या विस्तारातून विकासाचे जे स्वप्न पाहिले आहे, ते जरूर पाहावे. त्याचे श्रेयही घ्यावे. महसूल विभागाने एमआयडीसीकडे जमीन वर्ग केली, याचा आनंदही जरूर व्यक्त करावा. प्रसारमाध्यमांनीही या निर्णयाचे सकारात्मक स्वागत केले आहे. ही चांगली बाब आहे. आमची भूमिकाही औद्योगिक विकासाच्या विरोधात नाही. मात्र, वस्तुस्थितीकडे डोळेझाक करून केवळ ढोल वाजविणे आम्हाला प्रशस्त वाटत नाही. कारण धुळे जिल्ह्यातील औद्योगिक परिस्थितीची वस्तुस्थिती वेगळीच आहे.

धुळे सहकारी औद्योगिक वसाहत, अवधान येथील जुनी आणि विस्तारित औद्योगिक वसाहत तसेच नरडाणा ग्रोथ सेंटर या तिन्ही औद्योगिक क्षेत्रांची सद्यस्थिती पाहिली, तर नव्या औद्योगिक विस्ताराबाबत अनेक प्रश्न निर्माण होतात. रावेर येथील प्रस्तावित औद्योगिक वसाहतीची परिस्थितीही यापेक्षा वेगळी असेल, असे वाटत नाही. तेथे महसूल विभागाने घातलेल्या अटीही विचित्र असून, मभीक नको पण कुत्रा आवरफ अशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

औद्योगिक विकास महामंडळाच्या आकडेवारीनुसार अवधान औद्योगिक क्षेत्रासाठी २८५ हेक्टर जमीन अधिग्रहित करण्यात आली आहे. त्यापैकी १२२ हेक्टर क्षेत्र विकसित करण्यात आले आहे. म्हणजे अधिग्रहित जमिनीच्या निम्म्यापेक्षाही कमी क्षेत्राचा विकास झाला आहे.या विकसित क्षेत्रात उद्योगांसाठी ४९६ भूखंड तयार करण्यात आले आहेत. त्यापैकी आतापर्यंत ४४५ भूखंडांचे वाटप झाले आहे. अद्याप ५१ भूखंडांचे वाटप बाकी आहे. याशिवाय विस्तारासाठी उपलब्ध असलेली आणि अद्याप वाटप न झालेली ८४ हेक्टर जमीन शिल्लक आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ही परिस्थिती कायम आहे.

वाटप झालेल्या भूखंडांपैकी २१६ कारखाने सुरू असल्याचे एमआयडीसीची आकडेवारी सांगते. प्रत्यक्षात सुरू असलेल्या कारखान्यांची संख्या यापेक्षाही कमी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. ५२ उद्योगांचे बांधकाम प्रगतिपथावर असल्याचे सांगण्यात येते. या क्षेत्रात सात मोठे उद्योग असून उर्वरित बहुतांश लघुउद्योग आहेत. मात्र, या उद्योगांची अवस्था पाहता त्यांचा जीव गुदमरल्यासारखी परिस्थिती दिसते. अनेक उद्योग रखडलेले आहेत.नरडाणा ग्रोथ सेंटरची प्रगतीही अत्यंत संथ गतीने सुरू आहे. हे केंद्र एकूण ६५३ हेक्टर क्षेत्रावर नियोजित आहे. सध्या फेज एक आणि फेज दोनअंतर्गत ३५५ हेक्टर जमीन विकसित करण्यात आली आहे. मात्र, पुढील टप्प्यासाठी आवश्यक असलेले भूसंपादन रखडलेले आहे.पहिल्या दोन टप्प्यांमध्ये उपलब्ध करून दिलेल्या भूखंडांपैकी सुमारे ४० टक्के जमिनीवरच उद्योग सुरू आहेत. नरडाणा ग्रोथ सेंटरमध्ये पायाभूत सुविधा तुलनेने चांगल्या आहेत. तापी नदीवरील बॅरेजमधून पाणी उपलब्ध होते. रस्त्यांची सुविधाही तयार आहे. असे असतानाही उदासीनतेमुळे या औद्योगिक केंद्राचा अपेक्षित विकास झालेला नाही. काही उद्योजकांनी येथून काढता पाय घेतला, तर काहींची कर्जे थकल्याने त्यांचे उद्योग बंद पडले. थोडक्यात, या औद्योगिक क्षेत्रात अजूनही उद्योगविस्ताराला भरपूर वाव आहे. मात्र, उपलब्ध सुविधांचा पुरेपूर वापर करून घेण्यात आलेला नाही. दिल्ली–मुंबई औद्योगिक कॉरिडॉरचे स्वप्नही धुळे जिल्ह्याच्या बाबतीत पूर्णत्वास गेलेले नाही. हा प्रकल्प पुढे ढकलण्यात आला असून, छत्रपती संभाजीनगरजवळील बिडकीन येथे औद्योगिक विकासाला गती मिळत आहे. आपल्या जिल्ह्यात मात्र उद्योजक येण्यासाठी फारसे उत्सुक नाहीत. कारण उद्योगांना आकर्षित करणारे पोषक वातावरण येथे निर्माण झालेले नाही.१९८० च्या दशकात धुळे शहरात डीमा (धुळे इंडस्ट्रियल अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन) या संस्थेची स्थापना करण्यात आली होती. उद्योजकांना मार्गदर्शन करणारे मदनलाल सुराणा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या संस्थेची उभारणी केली होती.संस्थेचे अध्यक्ष पी. के. अण्णा पाटील होते. त्यांनी सातत्याने पाठपुरावा करून नरडाणा ग्रोथ सेंटर मंजूर करून आणले होते.मात्र, तेव्हापासून आजतागायत म्हणजे जवळपास वर्षांच्या कालखंडात या औद्योगिक वसाहतीने अपेक्षित प्रगती केलेली नाही. ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.धुळे सहकारी औद्योगिक वसाहत ही जिल्ह्यातील सर्वांत जुन्या औद्योगिक वसाहतींपैकी एक आहे. मात्र, तेथील बहुतेक उद्योग बंद पडले आहेत. अनेक उद्योग विक्रीसाठी उपलब्ध आहेत. म्हणजेच जिल्ह्यातील तिन्ही औद्योगिक वसाहतींमध्ये नव्या उद्योगांना संधी देण्यासाठी मोठ्या प्रमाणात जमीन आणि जागा उपलब्ध आहेत.

अशा परिस्थितीत आणखी जमीन उपलब्ध करून दिल्यानंतर तेथे नेमके कोणते उद्योजक येणार? त्यांना कोण आणणार? उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या सुरक्षिततेची हमी कोण देणार? पायाभूत सुविधांच्या उणिवा कशा दूर केल्या जाणार? स्थानिक पातळीवर कुशल मनुष्यबळ, बाजारपेठ आणि उद्योगपूरक वातावरण कसे निर्माण होणार? असे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत.

या सर्व पार्श्वभूमीवर रावेर येथील एमआयडीसीकडे महसूल विभागाकडून वर्ग करण्यात आलेल्या जमिनीकडे आणि त्या जमिनीवर उभ्या राहणाऱ्या संभाव्य उद्योगांच्या भवितव्याकडे केवळ विकासाच्या घोषणांच्या आधारे पाहून चालणार नाही. धुळे जिल्ह्यातील आधीच्या औद्योगिक वसाहतींचा अनुभव लक्षात घेऊनच पुढील निर्णय घ्यावे लागतील. अन्यथा, औद्योगिक विकासाच्या नावाखाली आणखी जमीन उपलब्ध होईल; पण प्रत्यक्षात उद्योग आणि रोजगारनिर्मितीचे स्वप्न मात्र अपूर्णच राहील.

## क्षुल्लक कारणाने युवकाचा खून

(पान १ वरून)

रात्री घरी का आला, या कारणावरून आरोपीने योगेश याला घरात पकडून घेरले आणि काहीतरी हत्याराने मारहाण केली. यात गंभीर जखमी झाल्याने योगेश याचा मृत्यू झाला.

याप्रकरणी दिलीप काल्या पावरा यांच्या फिर्यादीवरून धडगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०३(१) प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल सोनवणे करीत असून, प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश वावरे र यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## राष्ट्रीय एकता दिनी नशामुक्त भारत रॅली

**धुळे, दि.१- लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य साधून पोलिस विभाग व एस.एस.व्ही.पी.एस. विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नशामुक्त भारत हा सामाजिक जनजागृतीचा संदेश देण्यासाठी रॅलीचे दि. ३१ऑक्टोबर रोजी आयोजन करण्यात आले.**

या रॅलीच्या माध्यमातून व्यसनमुक्त समाज निर्माण करणे, युवकांना अमली पदार्थांच्या दुष्परिणामांपासून दूर ठेवणे तसेच समाजात व्यसनमुक्तीविषयी जनजागृती करणे हा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत व्यसनमुक्त भारताचा संकल्प व्यक्त केला. याप्रसंगी पोलिस विभागाचे प्रभारी अधिकारी प्रतापसिंग मोहिते व पोलिस विभागातील कर्मचारी उपस्थित होते. तसेच वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. के.एम. बोरसे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य आर. के. पाटील, डॉ. पी.बी. नेरपगार, महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते.

राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक बांधिलकी आणि युवकांचे उज्ज्वल भविष्य या मूल्यांची जाणीव करून देणारी ही रॅली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. व्यसनमुक्त भारताच्या निर्मितीसाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, हा महत्त्वपूर्ण संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील.

**स.नं. ४५० पैकी प्लॉट नं. १ चे एकूण क्षेत्र ४७३.९७ चौ. मी. यापैकी उत्तरेकडील दक्षिण भागाचे क्षेत्र ९३.२३ चौ. मी. १००३ चौ. फुट वरवळ प्लॉट हे १) रफीक अली मुश्ताक अली, २) यास्मिन बी रफिक अली दोघे रा. आझादनगर, धुळे यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजूर नकाशाप्रमाणे**

**मिळकतीचे मालक यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरुपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदा केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.**


सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, वारसा, हक्क, हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदापावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्युपत्र, मुख्त्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणेप्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरुन, माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे. दिनांक- १/११/२०२६.

**ॲड. दानिश अहमद अ. रऊफ (शेख)**
पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड,तिरगां चौक,धुळे.
मो.९८८१९२९४२४
नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट

प्रकाश में आज- बॉम्बे टु गोवा




अभिनाम बच्चन शत्रुहन सिध्दा महेमूद, अरूणा इराणी मुंखरी किशोर कुमार

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

### जाहीर नोटीस

निं.
**शिरपूर येथील मे. ज्युडी. मॅजी वर्ग १ यांचे कोर्टात**
क्रि. कि. अर्ज नं. २९१/२०२६

सजन गुलाब बेलदार
रा. दहिवद ता. शिरपूर जि. धुळे .... अर्जदार
विरुद्ध
१) म. तहसिल सो.
तहसिलदार कार्यालय शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे
२) म. निबंधक सो. जन्म, मृत्यू, व विवाह नोंदणी
ग्रामपंचायत कार्यालय, दहिवद ता.शिरपूर जि.धुळे... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. न्यायालयात अर्जदार नामे सजन गुलाब बेलदार यांचा जन्म दि. ०१/०१/१९४४ रोजी मौजे दहिवद ता. शिरपूर जि. धुळे येथे झालेला आहे. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) व दुरुस्ती कायदा २०२६ प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत जन्म दाखला मिळणे करीता अर्ज केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार नामे सजन गुलाब पावरा यांचे अर्जास कोणाची काही हरकत/ तक्रार असल्यास दि. ०७/११/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांचा जन्म दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक
फौजदारी न्यायालय,
शिरपूर, जि. धुळे
कोर्टाचा शिक्का
सहायक अधिक्षक
फौजदारी न्यायालय,
शिरपूर जि. धुळे

### जाहीर नोटीस

निं.
**शिरपूर येथील मे. ज्युडी. मॅजी वर्ग १ यांचे कोर्टात**
क्रि. कि. अर्ज नं. २९२/२०२६

शांतीलाल सखाराम पावरा,
रा. धवळीविहीर पो. आंबे ता. शिरपूर जि. धुळे .... अर्जदार
विरुद्ध
म. निबंधक सो.
जन्म, मृत्यू, व विवाह नोंदणी
ग्रामपंचायत कार्यालय,आंबे ता.शिरपूर जि.धुळे ... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. न्यायालयात अर्जदाराचा मुलगा नामे तन्मय शांतीलाल पावरा याचा जन्म दि. २६/०६/२०१६ रोजी मौजे धवळीविहीर पो. आंबे ता. शिरपूर जि. धुळे येथे झालेला आहे. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) व दुरुस्ती कायदा २०२६ प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत जन्म दाखला मिळणे करीता अर्ज केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की,नामे शांतीलाल सखाराम पावरा यांचे अर्जास कोणाची काही हरकत/ तक्रार असल्यास दि. ०७/११/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांचा जन्म दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय,
शिरपूर, जि. धुळे
कोर्टाचा शिक्का
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय,
शिरपूर जि. धुळे

### जाहीर नोटीस

अर्जदार वकील, ॲड.व्ही.एस.पाटील

**शिंदखेडा येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**
दि.कि.अर्ज नं.३४५/२०२६

१) श्रीमती.शोभा गोपाल माळी, २) मयुर गोपाल माळी,
अर्जदार नं.१ व २ रा.मु.पो.जनता नगर शिंदखेडा, ता.शिंदखेडा, जि.धुळे,
३) मनिषा निलेश माळी,
रा.मु.पो.उधना सुरत ....अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....जाबदेणार
कै.गोपाल सखाराम माळी, मृत्यू दि.०८/०८/२०२६ ....मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी नामे कै.गोपाल सखाराम माळी हे दि.०८/०८/२०२६ रोजी मौजे शिंदखेडा ता.शिंदखेडा येथे मयत झाल्यावर कै.गोपाल सखाराम माळी यांना अर्जदार नं १ शोभा गोपाल माळी हि पत्नी ह्या नात्याने अर्जदार नं.२ मयूर गोपाल माळी हा मुलगा ह्या नात्याने अर्जदार नं.३ मनिषा निलेश माळी हि मुलगी ह्या नात्याने कायदेशीर वारस आहेत या शिवाय त्यांना अन्य वारस नाहीत. नात्याने कायदेशीर वारस आहेत या शिवाय त्यांना अन्य वारस नाहीत. त्याअर्थी सदरहू मयतास अजून कोणी वारस आहेत किंवा काय? किंवा अर्जदारांनी अर्जात नमूद केलेल्या व्यक्ती मयताचे चे वारस नाहीत असे कोणाचे काहीही म्हणणे हरकत/तक्रार असल्यास त्यांनी दि.०२/१२/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मे.शिंदखेडा न्यायलयात स्वत:अगर वकील प्रतिनिधी मार्फत कागदपत्रासह हजर होवून लेखी हरकती नोद्वाव्यात मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास अर्जाची एकतर्फा सुनावणी घेण्यात येवून अर्जदार परागंदाचे कायदेशीर वारस आहेत असा कायदेशीर वारसांचा दाखला देण्याविषयी वारस प्रमाणपत्र देण्याविषयी पुढील योग्य तो आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. कळावे.

सदरहू जाहीर नोटीस मे.न्यायालयाचे आदेशावरून प्रसिद्धीस आपला महाराष्ट्र या वृत्त पत्रात दिली असे. शिंदखेडा, दि.१६/१०/२०२६

आदेशावरून
(कामगिरी कारकून)
शिक्का
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
शिंदखेडा, ता.शिंदखेडा, जि.धुळे

### जाहीर नोटीस

अर्जदार वकील, ॲड.एन.व्ही.पवार

**शिंदखेडा येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**
दि.कि.अर्ज नं.३४४/२०२६

१) श्रीमती.शोभाबाई दत्तू उर्फ दत्तात्रय पाटील, २) गणेश दत्तू उर्फ दत्तात्रय पाटील,
अर्जदार नं.१ व २ रा.मु.पो.चौगाव खु., ता.शिंदखेडा, जि.धुळे,
३) प्रतिभा अजय पाटील, रा.मु.पो.वडणे ता.जि.धुळे ....अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....जाबदेणार
कै.दत्तात्रय गाडगु देसले, मृत्यू दि.१२/१२/२०२४

ज्याअर्थी अर्जदार यानी कै.दत्तात्रय गाडगु देसले हे दि.१२/१२/२०२४ रोजी मौजे चौगाव खुर्द ता.शिंदखेडा जि.धुळे येथे मयत झाले आहेत. कै.दत्तात्रय गाडगु देसले हे मयत झाल्यानंतर अर्जदार नं.१ शोभाबाई दत्तू पाटील हि पत्नी ह्या नात्याने अर्जदार नं.२ गणेश दत्तू पाटील हा मुलगा ह्या नात्याने तसेच अर्जदार नं.३ प्रतिभा अजय पाटील हि मुलगी ह्या नात्याने कायदेशीर वारस आहेत या शिवाय त्यांना अन्य वारस नाहीत. असा कायदेशीर वारसांचा दाखला मिळण्याचा आदेश होणेस विनंती आहे. तसा कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी या मे.न्यायलयात अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदरहू मयताला अजून कोणी वारस आहेत किंवा काय? किंवा अर्जदारांनी अर्जात नमूद केलेल्या व्यक्ती मयताचे वारस नाहीत असे कोणाचे काहीही म्हणणे हरकत/तक्रार असल्यास त्यांनी दि.०१/१२/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मे.शिंदखेडा न्यायलयात स्वत:अगर वकील प्रतिनिधी मार्फत कागदपत्रासह हजर होवून लेखी हरकती नोद्वाव्यात मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास अर्जाची एकतर्फा सुनावणी घेण्यात येवून अर्जदार मयताचे कायदेशीर वारस आहेत असा कायदेशीर वारसांचा दाखला देण्याविषयी वारस प्रमाणपत्र देण्याविषयी पुढील योग्य तो आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. कळावे.

सदरहू जाहीर नोटीस मे.न्यायालयाचे आदेशावरून प्रसिद्धीस आपला महाराष्ट्र या वृत्त पत्रात दिली असे. शिंदखेडा, दि.१६/१०/२०२६

आदेशावरून
(कामगिरी कारकून)
शिक्का
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
शिंदखेडा

### जाहीर नोटीस

अर्जदार वकील, ॲड.व्ही.एस.पाटील

**शिंदखेडा येथील मे.न्यायदंडाधिकारी साहेब वर्ग-१ यांचे कोर्टात**
फौ.कि.अर्ज नं.२३८/२०२६

स्वप्नाली शरद बोरसे, उ.व.३९, धंदा- घरकाम,
रा.सरवड, ता.जि.धुळे. ....अर्जदार
विरूध्द
ग्रामसेवक ग्रामपंचायत वरसुस,
ता.शिंदखेडा, जि.धुळे. ....जाबदेणार

अर्जदार मौजे सरवड ता.जि.धुळे येथील कायमची रहिवाशी असून अर्जदार यांची मुलगी स्वप्नाली शरद बोरसे यांचा जन्म मौजे वरसुस ता.शिंदखेडा जि.धुळे येथे दि.०१/०२/१९८७ रोजी झाला आहे. त्याअर्थी सदरहू अर्जास कोणाचीही हरकत आहेत किंवा काय? किंवा अर्जदारांनी अर्जात नमूद केलेल्या व्यक्ती च्या जन्मा विषयी तारखे विषयी असे कोणाचे काही ही म्हणने हरकत/तक्रार असल्यास त्यांनी दि.०२/१२/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मे.शिंदखेडा न्यायलयात स्वत:अगर वकील प्रतिनिधी मार्फत कागदपत्रासह हजर होवून लेखी हरकती नोद्वाव्यात मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास अर्जाची एकतर्फा सुनावणी घेण्यात येवून अर्जदार अर्ज कायदेशीर आहे व अर्जदाराचा मुलीचा जन्म वरील तारखेस वरील ठिकाणी झाला आहे असा कायदेशीर आदेश दाखला देण्याविषयी पुढील योग्य तो आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. कळावे.

सदरहू जाहीर नोटीस मे.न्यायालयाचे आदेशावरून प्रसिद्धीस आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात दिली असे. शिंदखेडा, दि.२३/१०/२०२६

आदेशावरून
शिक्का
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालया
शिंदखेडा, ता.शिंदखेडा, जि.धुळे

### जाहीर नोटीस

अर्जदार वकील, ॲड.एन.व्ही.पवार

**शिंदखेडा येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**
दि.कि.अर्ज नं.३३०/२०२६

१) श्री.पांडुरंग बळीराम पाटील,
रा.मु.पो.माळीच, ता.शिंदखेडा, जि.धुळे ....अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....जाबदेणार
कै.गिताबाई बळीराम पाटील, मृत्यू दि.११/०६/१९९१

ज्याअर्थी अर्जदार यानी कै.गिताबाई बळीराम पाटील हे दि.११/०६/१९९१ रोजी मौजे माळीच ता.शिंदखेडा जि.धुळे येथे मयत झाले आहेत. कै.गिताबाई बळीराम पाटील हे मयत झाल्यानंतर एकमेव अर्जदार नं.१ पांडुरंग बळीराम पाटील हा मुलगा ह्या नात्याने कायदेशीर वारस आहेत या शिवाय त्यांना अन्य वारस नाहीत. असा कायदेशीर वारसांचा दाखला मिळण्याचा आदेश होणेस विनंती आहे. तसा कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी या मे.न्यायलयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहू मयताला अजून कोणी वारस आहेत किंवा काय? किंवा अर्जदारांनी अर्जात नमूद केलेल्या व्यक्ती मयताचे वारस नाहीत असे कोणाचे काहीही म्हणने हरकत/तक्रार असल्यास त्यांनी दि.२४/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मे.शिंदखेडा न्यायलयात स्वत:अगर वकील प्रतिनिधी मार्फत कागदपत्रासह हजर होवून लेखी हरकती नोद्वाव्यात मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास अर्जाची एकतर्फा सुनावणी घेण्यात येवून अर्जदार मयताचे कायदेशीर वारस आहेत असा कायदेशीर वारसांचा दाखला देण्याविषयी वारस प्रमाणपत्र देण्याविषयी पुढील योग्य तो आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. कळावे.

सदरहू जाहीर नोटीस मे.न्यायालयाचे आदेशावरून प्रसिद्धीस आपला महाराष्ट्र या वृत्त पत्रात दिली असे. शिंदखेडा, दि.१२/१०/२०२६

आदेशावरून
(कामगिरी कारकून)
शिक्का
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
शिंदखेडा

### नोटीस-जाहिरनामा

**शिरपूर येथील मे.कार्यकारी दंडाधिकारी सो., तथा मे.तहसिलदार सो. यांचे कोर्टात**
जन्म नोंद अर्ज नं. /२०२६, नि.

दिनेश सुभाराम पावरा, रा.तेल्यामहू पो.कोडीद,
ता.शिरपूर, जि.धुळे. ....अर्जदार
विरूध्द
म.ग्रामपंचायत अधिकारी सो.,
ग्रामपंचायत कार्यालय, कोडीद, ता.शिरपूर, जि.धुळे. ....जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी म.तहसिलदार सो, शिरपूर यांचे न्यायालयात दाखल केलेल्या अर्जानुसार अर्जदाराचा मुलगा नामे- गोपाल दिनेश पावरा याचा जन्म दि.०८/०५/२०२५ रोजी मौजे तेल्यामहू पो.कोडीद ता.शिरपुर जि.धुळे येथे जन्म झालेबाबत जन्म नोंद प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार याने महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(२)(३) प्रमाणे जन्म नोंद होणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक यांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, सदर अर्जास कोणाची काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास अर्ज दाखल केल्याचा दिनांकपासून त्यांनी १० दिवसाच्या आत कार्यकारी दंडाधिकारी शिरपूर यांच्या न्यायालयात स्वत:अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

प्रसिध्द दिनांक- २९/१०/२०२६, ठिकाण- शिरपूर,
नोटीस प्रसिध्द करणार संबंधित अर्जदारतर्फे

**ॲड.शरद वंजीलाल पावरा**
मु.पो.कोडीद ता.शिरपूर, जि.धुळे

### नोटीस-जाहिरनामा

**शिरपूर येथील मे.कार्यकारी दंडाधिकारी सो., तथा मे.तहसिलदार सो. यांचे कोर्टात**
जन्म नोंद अर्ज नं. /२०२६, नि.

अनिल रमेश पावरा,
रा.कोडीद, ता.शिरपूर, जि.धुळे. ....अर्जदार
विरूध्द
म.ग्रामपंचायत अधिकारी सो.,
ग्रामपंचायत कार्यालय, कोडीद, ता.शिरपूर, जि.धुळे. ....जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी म.तहसिलदार सो, शिरपूर यांचे न्यायालयात दाखल केलेल्या अर्जानुसार अर्जदाराचा मुलगा नामे- रशिद अनिल पावरा याचा जन्म दि.२०/०२/२०२५ रोजी मौजे कोडीद ता.शिरपुर जि.धुळे येथे जन्म झालेबाबत जन्म नोंद प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार याने महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(२)(३) प्रमाणे जन्म नोंद होणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक यांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, सदर अर्जास कोणाची काहीएक हरकत असल्यास अथवा काही खुलासा मांडावयाचा असल्यास अर्ज दाखल केल्याचा दिनांक पासून त्यांनी १० दिवसाच्या आत कार्यकारी दंडाधिकारी शिरपूर यांच्या न्यायालयात, स्वत:अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व कुणाचीही काहीएक हरकत नसल्याचे गृहीत धरुन सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

प्रसिध्द दिनांक- २९/१०/२०२६, ठिकाण- शिरपूर,
नोटीस प्रसिध्द करणार संबंधित अर्जदारतर्फे

**ॲड.शरद वंजीलाल पावरा**
मु.पो.कोडीद ता.शिरपूर, जि.धुळे




## सरदार पटेलांची जयंती रोझवा जि.प.शाळा साजरी

शहादा, दि.१(प्रतिनिधी)- तळोदा तालुक्यातील रोझवा पुनर्वसन क्रमांक-४ येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक आदर्श शाळेत भारताचे पहिले उपपंतप्रधान व गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांच्या परिपाठानंतर शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी शिक्षक रमेश राऊत, अर्जुन वसावे, जयवंती चौधरी व मालती पाडवी यांनी राष्ट्रीय एकता दिनाचे महत्त्व विशद केले. राष्ट्रीय एकात्मता आणि बंधुभाव टिकवून ठेवण्यासाठी त्यांच्या कार्याचे स्मरण करणे आवश्यक असल्याचे शिक्षकांनी सांगितले. एकतेशिवाय जनशक्ती प्रभावी ठरू शकत नाही, असा संदेशही यावेळी देण्यात आला.

धुळे दि.१ (प्रतिनिधी)- **बोरकुंड येथील इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान संचलीत, मुक्तांगण शैक्षणिक संकुलमधील हर्षल देसले, मयूर राणे आणि तुषार निकम यांची राज्यस्तरीय शालेय स्पर्धे साठी निवड झाली. विभागस्तरीय स्पर्धेचे मैदान गाजविल्यानंतर मुक्तांगणचे हे विद्यार्थ्यी आता नाशिक विभागाचे प्रतिनिधीत्व करतील. या विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**

जळगाव येथे नुकतीच आंतरशालेय नाशिक विभागीय सॉफ्ट टेनिस स्पर्धा संपन्न झाली. यात

### इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान संचलीत

## मुक्तांगण शैक्षणिकच्या विद्यार्थांची सॉफ्ट टेनिसच्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

बोरकुंड येथील मुक्तांगण सेमी इंग्लिश स्कूलच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत विभागीय स्तरावर अजिंक्यपद मिळवले. नाशिक, जळगाव व नंदुरबार जिल्ह्यांतील प्रतिस्पर्धी खेळाडूंवर मात करत, मुक्तांगणच्या हर्षल देसले, मयूर राणे आणि तुषार निकम या तीन खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. सदर विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली आहे. हे तिन्ही खेळाडू राज्यस्तरावर नाशिक विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. विभागीय स्तरावर मिळविलेल्या या दैदीप्यमान यशामुळे मुक्तांगण सेमी इंग्लिश स्कूलच्या क्रीडा क्षेत्रातील यशावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. एकाच शाळेतील तीन खेळाडूंनी राज्यस्तरावर मजल मारल्याने शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, परिसरातून खेळाडूंचे कौतुक होत आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे, सचिव शालिनीताई भदाणे, प्राचार्य एस.एन.पाटील, क्रीडा शिक्षक अक्षय हिरे तसेच शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## सावऱ्यादिगर येथे वनराई बंधारा

**(पान १ वरून)** पशूपक्षी यांना पाण्याची सोय करण्यात येत आहे व स्थानिक गुरे ढोरे यांना देखील तहान भागवण्यासाठी वनराई बंधाऱ्याची मदत होणार आहे. सदर बंधाऱ्याचे काम केल्याबद्दल ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला. या उपक्रमात सरपंच दिलीप पावरा, माजी सरपंच राड्या पावरा, माजी पंचायत समिती सदस्य ठाणसिंग पावरा, पोलीस पाटील पोडया पावरा, छगन पावरा, प्रताप पावरा व ग्रामस्थ यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. सदर उपक्रम नंदुरबार वनविभागाचे उपवनसंरक्षक संतोष सस्ते यांच्या आदेशाने व सहाय्यक वनसंरक्षक रोशन बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली बिलगाव (प्रा.) वनक्षेत्रपाल लक्ष्मीकांत शेंडगे यांच्या नेतृत्वाखाली वनपाल भरतसिंग परदेशी, उपक्रम यशस्वीतेकरिता प्रयत्न केले.

### जाहीर नोटीस

प्रति,
श्री. दिलीप जीवन माळी,
७५ /अ, नटेश्वर हौसिंग सोसायटी, वाखारकर नगर, धुळे.

आमचे पक्षकार श्री.सुरेशकुमार हजारीमल दोशी, एच.यु.एफ. रा.३०, वाखारकर नगर, धुळे यांनी समक्ष येऊन दिलेल्या माहितीवरून, दाखवलेल्या कागदपत्रांच्या आधारे व मला दिलेल्या कायदेशीर अधिकारावरून आपणास या जाहीर नोटिसीद्वारे खालीलप्रमाणे आवाहन करण्यात येते की:

आपण आमचे पक्षकार यांच्याशी मौजे धुळे येथील स.क्र.४०१/१+२+३ यापैकी प्लॉट क्र.७० विस्तारित सि.स.क्र.१०८९७, क्षेत्र १५७.५० चौ.मी. सदर बखळ प्लॉटच्या कायम खरेदीचा लेखी व्यवहार दिनांक २०.०९.२०२४ रोजी केलेला आहे. सदर व्यवहारापोटी ठरलेली बयाणा रक्कम आपण स्वीकारलेली आहे. सदर व्यवहारातील अटी व शर्तींची पूर्तता करून आपण खरेदीखत करून देणे बंधनकारक होते. या संदर्भात खरेदीखत करून देण्याबाबत आमचे पक्षकारांनी यापूर्वी ३ वेळा आपणास रजिस्टर्ड पोस्टाने कायदेशीर नोटिसा पाठविल्या होत्या. परंतु, आपण त्या सर्व नोटिसा जाणीवपूर्वक व गैरहेतूने स्वीकारल्या नाहीत.

परिणामी, आपणाकडून सदर व्यवहारात ठरलेल्या अटी व शर्तींचा सातत्याने भंग होत आहे.

तरी, आपणास या जाहीर नोटिसीद्वारे अंतिम आवाहन करण्यात येते की, वर नमूद मिळकतीचे कायदेशीर खरेदीखत आमचे पक्षकारांचे नावे नोंदवून सदर व्यवहार सात दिवसांच्या विहित मुदतीत पूर्ण करावा. आपण असे न केल्यास, नाईलाजास्तव आपणाविरुद्ध योग्य ती दिवाणी व फौजदारी कायदेशीर कारवाई करण्यात येईल व त्यातून उद्भवणाऱ्या सर्व खर्चास आणि नुकसानीस आपण स्वतः जबाबदार राहाल, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट-** मिळकतीचे वर्णन :- मौजे धुळे येथील स.क्र. ४०१/१+२+३ पैकी प्लॉट क्र ७०, क्षेत्र १५७.५० चौ.मी., विस्तारित सि.स.क्र.१०८९७. (पूर्वेस : प्लॉट क्र १२५,

चतु:सीमा: पूर्वेस : १५ मी प्लॉट क्र १२५, पश्चिमेस : १५ मी प्लॉट क्र ६९, दक्षिणेस : ०९ मी स.क्र. पैकी भाग, उत्तरेस : १२ मी (९ मी चा रस्ता). धुळे, दिनांक- २७/१०/२०२६.

**ॲड.प्रशांत रमाकांत सोनार**
ऑफिस- २०४, ॲडव्होकेट चेंबर्स बिल्डींग जिल्हा व सत्र न्यायालया परिसर स्टेशन रोड, धुळे-४२४००१.
**मो.नं.९४२३९९०५८८९, ९९२३२६५२१०**

### जाहीर नोटीस/इशारा

तमाम जनतेस आमचे पक्षकार श्री.सुरेशकुमार हजारीमल दोशी, एच.यु.एफ. रा.३०, वाखारकर नगर, धुळे यांनी समक्ष येऊन दिलेल्या माहितीवरून, दाखवलेल्या कागदपत्रांच्या आधारे व मला दिलेल्या कायदेशीर अधिकारावरून तमाम जनतेस, बँक, वित्तीय संस्था, धुळे महानगरपालिका यांना जाहीर नोटिसीद्वारे सूचित करण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत श्री.दिलीप जीवन माळी रा. ७५/अ, नटेश्वर हौसिंग सोसायटी, वाखारकर नगर, धुळे यांच्या मालकीची आहे.

सदर मिळकतीबाबत आमचे पक्षकार श्री.सुरेशकुमार हजारीमल दोशी, एच.यु.एफ. रा.३०, वाखारकर नगर, धुळे तसेच श्री.दिलीप जीवन माळी यांच्यामध्ये कायम खरेदीचा लिखित व्यवहार सौदा पावती, अगोदरच झालेला आहे.

सदर लेखी व्यवहारापोटी आमचे पक्षकार व श्री.माळी यांच्यात पैशांची कायदेशीर देवाण-घेवाण देखील झालेली आहे. अशा परिस्थितीत, सदर मिळकतीवर आमचे पक्षकारांचा कायदेशीर हक्क व हितसंबंध निर्माण झालेले असल्याने, कोणत्याही व्यक्तीने, बँकेने, वित्तीय संस्थेने किंवा बिल्डरने सदर मिळकतीबाबत श्री.दिलीप जीवन माळी यांच्याशी खरेदी-विक्री, गहाण, दान, बक्षीसपत्र, साठेखत किंवा इतर कोणताही आर्थिक व कायदेशीर व्यवहार करू नये.

सदर सूचनेनंतरही जर कोणीही सदर मिळकतीबाबत कोणताही व्यवहार करून त्रयस्थ हक्क निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास, तो व्यवहार आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच, तसे केल्यास त्याची सर्वस्वी कायदेशीर व आर्थिक जबाबदारी ही श्री.माळी व सदर मिळकतीबाबत व्यवहार करणाऱ्या संबंधित व्यक्तीवर राहील. याबाबत आमचे पक्षकार योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यास मोकळे राहतील, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**परिशिष्ट-**(मिळकतीचे वर्णन): मौजे धुळे येथील स.क्र. ४०१/१+२+३ यापैकी प्लॉट क्र ७०, एकूण क्षेत्र १५७.५० चौ.मी. (१६९४.७० चौ. फूट) बखळ प्लॉट. विस्तारित सि.स.क्र.१०८९७.

चतु:सीमा: पूर्वेस १५ मी प्लॉट क्र १२५, पश्चिमेस १५ मी प्लॉट क्र ६९, दक्षिणेस: ०९ मी स.क्र. पैकी भाग, उत्तरेस : १२ मी (९ मी चा रस्ता). धुळे, दिनांक- २७/१०/२०२६.

**ॲड.प्रशांत रमाकांत सोनार**
ऑफिस- २०४, ॲडव्होकेट चेंबर्स बिल्डींग जिल्हा व सत्र न्यायालया परिसर स्टेशन रोड, धुळे-४२४००१.
**मो.नं.९४२३९९०५८८९, ९९२३२६५२१०**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, निजामपूर ता. साक्री जि. धुळे येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ८ पैकी प्लॉट नं. १९ क्षेत्र ४६.७४ चौ. मी. व ५०३ चौ. फुटाचा प्लॉट त्याचा ग्रामपंचायत मिळकत क्र. ४३६/२ या प्लॉटवर तीन रुमचे बांधकाम केलेले असून सदरील बांधकाम केलेला प्लॉट हा यांसी चतु:सिमा पुर्वेस प्लॉट नं. २०, पश्चिमेस : रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. १९ पैकी उर्वरित भाग, दक्षिणेस : प्लॉट नं. २४ अशी चतु:सिमा असलेला बांधकाम केलेला प्लॉट ही मिळकत श्री. पंकज दिलीप अहिरे, रा. संजयनगर, जैताणे (निजामपूर) ता. साक्री जि. धुळे ४२४३०५, मो. नं. ९६६०८३९८३८ आधार क्र. ४६७२२९८३१९७३ याचे मालकीची असून त्यांनी सदर मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे. त्या व्यवहाराकरीता आमच्या अशिलाने श्री. पंकज दिलीप अहिरे यांना बयाणा रक्कम चेकने दिलेली आहे. व आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरात लवकर १५ दिवसात पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी संस्था, वित्तीय संस्था, बँका, व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हितसंबंध व अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा पावती व सौदा करार, मुखत्यार वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर मिळकतीत कोणत्याही प्रकारे हक्क हिस्सा,अधिकार असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीस मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून त्यांच्या लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर मात्र कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आज रोजी आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि. ३१/१०/२०२६

**ॲड.चैतन्य मोहन भंडारी मो.७७७४९७७७७९**
ऑफिस : २१३ व २०३, ॲडव्होकेट चेम्बर्स, बिल्डींग, धुळे जिल्हा न्यायालय परिसर, स्टेशन रोड, धुळे ४२४००१

### नोटीस

तमाम लोकांस सर्व संबंधितांस व विशेषत: चंद्रभान बन्सीलाल मारवाडी (जैन) रा. २८, भगा मोहन नगर, पारोळा रोड, धुळे यास आमचे अशिल श्री. विजय बन्सीलाल मारवाडी (जैन) यांनी दिलेल्या माहितीवरुन सदरहू नोटीसीने कळविण्यात येते की,

तु. जि. धुळे पो. तु. ता. धुळे पैकी, मौजे अंचाडे ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. ६९/२ क्षेत्र ६ हे. ५१ आर. आकार रु. १३.२५ पैसे ची शेतजमीन आमचे अशिलांची वडिलोपार्जित शेतजमीन होती व आहे. भाउ हिश्श्याने सदरची जमीन आमचे आशिलांचे वडील बन्सीलाल सुपडू मारवाडी (जैन) यांचेकडे आली होती. ती त्यांची स्वकमाईची अगर स्वकष्टार्जीत, स्वसंपादतीत मिळकत नव्हती व नाही. आमचे अशिलांचे वडील बन्सीलाल सुपडू मारवाडी यांचे दिनांक १३/१२/२०२४ रोजी निधन झालेले आहे. त्यांच्या मृत्यूपश्चात वारस हक्काने सदरच्या जमीनी आमचे आशिलास हक्क,अधिकार, हिस्सा, हितसंबंध, प्राप्त झालेला होता व आहे. कै. बन्सीलाल सुपडू मारवाडी यांचे मृत्यूपश्चात सदर जमीनच्या महसूल दप्तरी उताऱ्यावर नाव लावण्यासाठी आमचे अशिल तलाठी कार्यालयात गेले असता आणि तेथून त्यांनी सदर जमीनीचा उतारा मिळविला असता, फेरफार नोंद क्रमांक ३०७६ च्या नोंदीन्वये आमचे आशिलांचे पिता कै. बन्सीलाल सुपडू मारवाडी (जैन) यांच्या तथाकथीत दि. २७/११/२०१३ रोजीच्या मृत्यूपत्रान्वये सदरची मिळकत आमचे अशिलाचे भाऊ चंद्रभान बन्सीलाल जैन यांनी बेमालूमपणे आमचे अशिलांस कै. बन्सीलाल सुपडू मारवाडी (जैन) यांच्या इतर कोणाही वारसास माहिती न मिळू देता, पडू देता सदरची जमीन परस्पर त्यांचे एकट्याचे नावावर वर्ग करुन घेतलेली असल्याची आमचे अशिलास माहिती मिळाली असून आमचे आशिलांचे भाऊ चंद्रभान बन्सीलाल मारवाडी (जैन) हे सदर मिळकतीच्या हस्तांतरणाच्या प्रयत्नात असल्याचेही आमचे आशिलांस खात्रीलायकरित्या समजले आहे.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणीही चंद्रभान बन्सीलाल जैन रा. २८, भगा मोहन नगर, पारोळा रोड, धुळे यांचेशी कोणत्याही प्रकारचा करार मदार, सौदे करार अगर अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. तसा कोणी काही व्यवहार केल्यास तो आमचे आशिलांवर तसेच सदर मिळकतीवरही बंधनकारक राहणार नाही. कळावे. दि. १/११/२०२६

**ॲड.रोशन महेश पाटील मो..७५८८५१९१७१**
६८, लक्ष्मीनगर, रामचंद्र नगर जवळ, पारोळा रोड, धुळे ४२४००१

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, यांना या जाहीर नोटीसीने कविण्यात येते की, मौजे बाळापूर ता. जि. धुळे येथील शेत जमीनी

१) गट नं. ४४/२ यासी ला.ला.क्षेत्र ० हे. ४६ आर. पो.ख. ० हे. ० आर. एकूण क्षेत्र ० हे. ४६ आर यासी आकार २ रु. ५० पैसे यांसी चतु:सिमा खालील प्रमाणे
पुर्वेस : गट नं. ४५ पश्चिमेस : याच मिळकतीचा भाग
दक्षिणेस : रस्ता उत्तरेस : गट नं. ३५

२) गट नं. ४५ यासी ला. ला. क्षेत्र ० हे. ७५ आर. पो. ख. ० हे. ० आर. एकूण क्षेत्र ० हे. ७५ आर यासी आकार २ रु. २५ पैसे यांसी चतु:सिमा गावनकाशा प्रमाणे.
पुर्वेस : ४६ पश्चिमेस : गट नं. ४४
दक्षिणेस : रस्ता उत्तरेस : गट नं. ३५

येणेप्रमाणे वर्णनाच्या व चतु:सिमेच्या आतील मिळकती या ज्ञानेश्वर रामदास (फुलपगारे) रा. जुने धुळे ता. जि. धुळे यांचे मालकीच्या व ताबे उपभोगातील आहेत. सदर वरीलप्रमाणे मिळकती आमचे अशिलांनी कायम खरेदीने विकत घेण्याचा सौदा केलेला आहे व त्यापोटी बयाणा रक्कम दिलेली आहे. लवकरच आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी तमाम लोकांना, सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास तसेच मिळकत, हक्क, हिस्सा, टांच, गहाण, जप्ती, वहिवाट, बक्षिस, मृत्यूपत्र, सौदा पावती, बोजा, खावटी हक्क, कोर्ट कचेरी असे कोणत्याही प्रकारचे हक्क किंवा हितसंबंध असल्यास लेखी हरकत किंवा तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर कळवावी.

मुदतीत हरकती अगर तक्रारी न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ही नोटीस आमच्या अशिलांच्या सुचनेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.
दिनांक १/११/२०२६ स्थळ : धुळे

**ॲड. प्रशांत आर. कोठारी मो..९८८१३८८१९५**
३१/१, प्रोफेसर कॉलनी, देवपूर, धुळे

### जाहीर नोटीस नि.

**शिरपूर येथील मे. ज्युडी. मॅजी वर्ग १ यांचे कोर्टात**
क्रि. कि. अर्ज नं. ४२५/२०२६

**रविंद्र भावसिंग भिल,**
**रा. खामखेडा प्र. आंबे ता. शिरपूर जि. धुळे .... अर्जदार**
विरुद्ध
**म. निबंधक सो.**
**जन्म, मृत्यू, व विवाह नोंदणी**
**ग्रामपंचायत कार्यालय, खामखेडा प्र.आंबे**
**ता. शिरपूर जि. धुळे .... जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. न्यायालयात अर्जदार नामे रविंद्र भावसिंग भिल यांचा जन्म दि. ०१/०६/१९९९ रोजी मौजे खामखेडा प्र. आंबे ता. शिरपूर जि. धुळे येथे झालेला आहे. अर्जदार यांना जन्म दाखल्याची आवश्यकता असल्याने कलम १३(३अ) प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत जन्म दाखला मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार नामे रविंद्र भावसिंग भिल यांचे अर्जास कोणाची काही हरकत/ तक्रार असल्यास दि. ०३/१२/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांचा जन्म दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक, फौजदारी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — कोर्टाचा शिक्का — सहायक अधिक्षक, फौजदारी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

### जाहीर नोटीस नि.

**शिरपूर येथील मे. ज्युडी. मॅजी वर्ग १ यांचे कोर्टात**
क्रि. कि. अर्ज नं. ४३२/२०२६

**जयराम बाबु भिल**
**रा. खामखेडा प्र. आंबे ता. शिरपूर जि. धुळे .... अर्जदार**
विरुद्ध
**म. निबंधक सो.**
**जन्म, मृत्यू, व विवाह नोंदणी**
**ग्रामपंचायत कार्यालय, खामखेडा प्र.आंबे**
**ता. शिरपूर जि. धुळे .... जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. न्यायालयात अर्जदाराचा मुलगा नामे रविंद्र जयराम भिल यांचा जन्म दि. २४/०२/२०११ रोजी मौजे खामखेडा प्र. आंबे ता. शिरपूर जि. धुळे येथे झालेला आहे. अर्जदार यांना जन्म दाखल्याची आवश्यकता असल्याने कलम १३(३-अ) प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत जन्म दाखला मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार नामे जयराम बाबु भिल यांचे अर्जास कोणाची काही हरकत/ तक्रार असल्यास दि. ०३/१२/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांचा जन्म दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक, फौजदारी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — कोर्टाचा शिक्का — सहायक अधिक्षक, फौजदारी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

### जाहीर नोटीस अॅड. सचिन एस. पवार वरपाडे नि.

**शिंदखेडा येथील मे. ज्युडी. मॅजी वर्ग १ यांचे कोर्टात**
क्रि. कि. अ. नं. २५६/२०२६

सुलोचना बहादुरसिंग राजपूत (लग्नाआधीचे नांव)
सुलोचना विक्रमसिंग राजपूत (लग्नानंतरचे नांव)
**उ. व. ६३, धंदा : घरकाम**
**रा. भोरखेडा ता. शिरपूर जि. धुळे .... अर्जदार**
विरुद्ध
**म. ग्रामपंचायत अधिकारी सो.**
**ग्रामपंचायत कार्यालय,**
**हुंबर्डे -वडली ता. शिंदखेडा जि. धुळे ... जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. न्यायालयात दाखल केलेल्या अर्जानुसार अर्जदार नामे सुलोचना बहादुरसिंग राजपूत हिजा जन्म दि. २७/११/१९६३ रोजी मौजे हुंबर्डे -वडली ता. शिंदखेडा जि. धुळे येथे जन्म झालेबाबत जन्म नोंद प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदार यांनी महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३अ) प्रमाणे जन्म नोंद होणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सर्व सर्वसंबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांचा जन्मासंबंधी कुणाची काही हरकत/ आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. १४/१२/२०२६ राजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा, अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, अथसे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.. दि. २९/१०/२०२६

कनिष्ठ लपीक, फौजदारी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — कोर्टाचा शिक्का — सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

### जाहीर नोटीस नि.

**शिरपूर येथील मे. ज्युडी. मॅजी वर्ग १ यांचे कोर्टात**
क्रि. कि. अर्ज नं. ४३८/२०२६

**नाना उखा भिल**
**रा. खामखेडा प्र.आंबे ता. शिरपूर जि. धुळे .... अर्जदार**
विरुद्ध
**म. निबंधक सो.**
**जन्म, मृत्यू, व विवाह नोंदणी**
**ग्रामपंचायत कार्यालय,**
**खामखेडा प्र.आंबे ता.शिरपूर जि.धुळे ... जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. न्यायालयात अर्जदार नामे नाना उखा भिल यांचा जन्म दि. ०१/०६/१९८८ रोजी मौजे खामखेडा प्र. आंबे ता. शिरपूर जि. धुळे येथे झालेला आहे. अर्जदार यांना जन्म दाखल्याची आवश्यकता असल्याने कलम १३ (३अ) प्रमाणे जन्म नोंद होणेबाबत जन्म दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार नामे नाना उखा भिल यांचे अर्जास कोणाची काही हरकत/ तक्रार असल्यास दि. ०३/१२/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांचा जन्म दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक, फौजदारी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — कोर्टाचा शिक्का — सहायक अधिक्षक, फौजदारी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

### जाहीर नोटीस नि.

**शिरपूर येथील मे. ज्युडी. मॅजी वर्ग १ यांचे कोर्टात**
क्रि. कि. अर्ज नं. ३४३/२०२६

**भिकुबाई गणसिंग भिल (लग्नाआधीचे नांव)**
**भिकुबाई भाईदास भिल (लग्नानंतरचे नांव)**
**रा. पटेल फालिया हिंगवा भाखली ता. सेंधवा जि. बडवानी .... अर्जदार**
विरुद्ध
**म. निबंधक सो.**
**जन्म, मृत्यू, व विवाह नोंदणी ग्रामपंचायत कार्यालय,**
**खामखेडा प्र.आंबे ता.शिरपूर जि.धुळे ... जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. न्यायालयात अर्जदार नामे भिकुबाई गणसिंग भिल (लग्नाआधीचे नांव) भिकुबाई भाईदास भिल (लग्नानंतरचे नांव) यांचा जन्म दि. ०१/०१/१९७६ रोजी मौजे खामखेडा प्र. आंबे ता. शिरपूर जि. धुळे येथे माहेरी झालेला आहे. अर्जदार यांना जन्म दाखल्याची आवश्यकता असल्याने कलम १३ (३अ) प्रमाणे जन्म नोंद होणेबाबत जन्म दाखला मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार नामे भिकुबाई गणसिंग भिल (लग्नाचे आधीचे नांव) भिकुबाई भाईदास भिल (लग्नानंतरचे नांव) याचे अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि. ३०/११/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांचा जन्म दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक, फौजदारी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — कोर्टाचा शिक्का — सहायक अधिक्षक, फौजदारी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

### जाहीर नोटीस नि.

**शिरपूर येथील मे. ज्युडी. मॅजी वर्ग १ यांचे कोर्टात**
क्रि. कि. अर्ज नं. ३००/२०२६

**सायजाबाई नागू भिल**
**रा. वरझडी ता. शिरपूर जि. धुळे .... अर्जदार**
विरुद्ध
**१) म. निबंधक सो.**
**जन्म, मृत्यू, व विवाह नोंदणी**
**ग्रामपंचायत कार्यालय,बोराडी**
**ता.शिरपूर जि.धुळे ... जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. न्यायालयात अर्जदाराचे आजोबा नामे पहाडू चत्रू भिल यांचा मृत्यू दि. १०/०८/१९८३ रोजी मौजे बोराडी ता. शिरपूर जि. धुळे येथे झालेला आहे. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) व दुरुस्ती कायदा २०२६ प्रमाणे मृत्यू नोंद होणे बाबत मृत्यू दाखला मिळणे करीता अर्ज केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे अर्जास कोणाची काही हरकत/ तक्रार असल्यास दि. ०७/११/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांचा जन्म दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — कोर्टाचा शिक्का — सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

### जाहीर नोटीस नि.

**शिरपूर येथील मे. ज्युडी. मॅजी वर्ग १ यांचे कोर्टात**
क्रि. कि. अर्ज नं. ३९०/२०२६

**प्रदिप जयराम भिल**
**रा. खामखेडा प्र.आंबे ता. शिरपूर जि. धुळे .... अर्जदार**
विरुद्ध
**म. निबंधक सो.**
**जन्म, मृत्यू, व विवाह नोंदणी**
**ग्रामपंचायत कार्यालय,**
**खामखेडा प्र.आंबे ता.शिरपूर जि.धुळे ... जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मे. न्यायालयात अर्जदार नामे प्रदिप जयराम भिल यांचा जन्म दि. २७/०९/२००८ रोजी मौजे खामखेडा प्र. आंबे ता. शिरपूर जि. धुळे येथे झालेला आहे. अर्जदार यांना जन्म दाखल्याची आवश्यकता असल्याने कलम १३ (३अ) प्रमाणे जन्म नोंद होणेबाबत जन्म दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार नामे प्रदिप जयराम भिल यांचे अर्जास कोणाची काही हरकत/ तक्रार असल्यास दि. ०१/१२/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांचा जन्म दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक, फौजदारी न्यायालय, शिरपूर, जि. धुळे — कोर्टाचा शिक्का — सहायक अधिक्षक, फौजदारी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

### जाहीर नोटीस नि. ७

**शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ( सि. डी.) यांचे कोर्टात**
दिवाणी कि. अर्ज नं. ९८५/२०२६

**बेबीबाई रामदास वानखेडे वगैरे ८ .... अर्जदार**
विरुद्ध
**कोणीही नाही .... जाबदेणार**

ज्याअर्थी मयत रामदास बुधाजी उर्फ बुधा वानखेडे हे दि. २०/१०/२०११ रोजी मौजे विक्रोळी मुंबई येथे मयत झालेले असून, त्यांचे नावे मौजे अजंदे खुा. ता. शिरपूर जि. धुळे शिवारातील शेत गट नं. १२/१, क्षेत्र १ हे. २१ आर. आकार ३ रु. ०० पैसे या वर्णनाची सामाईक मालकीची शेत मिळकत असून सदरील शेत मिळकतीवर अर्जदार नं. ते ८ यांची नावे वारस म्हणुन लावणेसाठी अर्जदार यांना मयताचा वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने व शासकीय व निमशासकीय कामांसाठी व अर्जदार नं. १ ते ८ हेच

## पान १ वरुन

### राजकीय स्वार्थासाठी शीख नरसंहारातील

देशातील जनतेने मतदानातून सरकार निवडले आहे. मात्र, विरोधकांकडून जनादेशाचा अपमान केला जात आहे. अशा परिस्थितीत एनडीएचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरून लोकशाहीचा आवाज बुलंद करत आहेत. काँग्रेसच्या संविधान विषयक भूमिकेवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. संविधानाची प्रत हातात घेऊन फिरणाऱ्या काँग्रेसनेच संविधानाचा अवमान केल्याचा आरोप त्यांनी केला. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या निवडणुकीच्या संदर्भातही त्यांनी काँग्रेसवर टीका केली.

राहुल गांधींचा घुसखोरांवर विश्वास

नितीन नबीन यांनी राहुल गांधी यांच्यावर टीका करताना, त्यांना देशातील १४० कोटी जनतेपेक्षा तीन कोटी घुसखोरांवर विश्वास असल्याचा आरोप केला. लोकशाहीमध्ये जनतेचे मत सर्वात महत्त्वाचे असून, जनतेने प्रत्येक वेळी मतदानातून आपला निर्णय दिला आहे, असे ते म्हणाले. दरम्यान, भाजपच्या या देशव्यापी आंदोलनामुळे भाजप आणि काँग्रेसमधील राजकीय संघर्ष पुन्हा एकदा तीव्र झाला आहे. विशेष म्हणजे, १९८४ च्या शीखविरोधी हिंसाचाराच्या स्मृती आणि मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनाचा मुद्दा यामुळे राजकीय वातावरण तापले आहे.

### गृहमंत्री पांडू हवालदार सपकाळांचा घणाघात

आरोपावर सपकाळ यांनी फडणवीसांना प्रत्युत्तर दिले. केंद्रीय गृह मंत्रालय तुमच्याच ताब्यात आहे. त्यामुळे चीनकडून फंडिंग होत असल्याचे वाटत असेल, तर आरोप करण्याऐवजी त्याची चौकशी करून पुरावे समोर आणा. अशा प्रकारचे आरोप करून सरकारला आपली जबाबदारी झटकता येणार नाही. फडणवीस सरकार संविधानाची पायमल्ली करत असून, खोटे आरोप करून राजकीय वातावरण तापवले जात असल्याचा आरोपही सपकाळ यांनी केला. पक्षफोडी आणि मतचोरीच्या माध्यमातून भाजप सत्तेत आल्याचा दावाही त्यांनी केला.

**राहुल गांधींच्या नावाची भीती**

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आरोपांवर प्रश्न उपस्थित केले. मुख्यमंत्र्यांना अराजकता नेमकी कुठे दिसली, असा सवाल त्यांनी केला. मतचोरी करून सरकार स्थापन केल्याचा आरोप करत वडेट्टीवार म्हणाले की, आजच्या रामलीला मैदानावरील रॅलीमध्ये अराजकता कुठेही दिसली नाही. राहुल गांधी यांच्या नावाची भीती आणि धाक भाजप नेत्यांच्या मनात असल्यामुळेच ते अशा प्रकारची वक्तव्ये करत आहेत, अशी टीकाही त्यांनी केली. चीनकडून फंडिंग घेतल्याचा आरोप केला जात असेल, तर त्याचे पुरावे समोर आणावेत. केवळ आरोप करून चालणार नाही, असे आव्हानही वडेट्टीवार यांनी दिले.

**आंदोलनात चुकले काय: सतेज पाटील**

काँग्रेस नेते सतेज पाटील यांनीही फडणवीस यांच्या वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली. निवडणुकीतील कथित गैरप्रकारांबाबत राहुल गांधी सातत्याने आवाज उठवत आहेत. निवडणूक प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित होत असताना त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री मुळ मुद्द्यांवर बोलण्याऐवजी विषयांतर करणारी वक्तव्ये करतात, असा आरोप पाटील यांनी केला. लोकशाहीमध्ये चुकीच्या गोष्टींविरोधात आंदोलन करणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे. मग आंदोलन केले तर चुकले काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ट्रकभर पुरावे देण्याचे यापूर्वीही आरोप करण्यात आले होते. त्यानंतर पुढे काय झाले, हे सर्वांनी पाहिले आहे. मुळ मुद्द्याला बगल देऊन वेगळेच विषय उपस्थित करण्याची मुख्यमंत्र्यांची भूमिका असल्याची टीकाही सतेज पाटील यांनी केली.

### कर्जासाठी बोरीसला शेतकऱ्याचा टोकाचा निर्णय

त्यांनी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांचा बोजा कमी करण्याबाबत आणि नवीन पीक कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत आश्वासन दिल्याचा दाखला शेतकरी माळी यांनी दिला. बँक प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले. शासनाने बँकांना नवीन कर्ज देण्याबाबत सूचना केल्या असतील, तर शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ का केली जाते, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

**बँक प्रशासनाची चौकशी करा**

पीक कर्जासाठी शेतकऱ्यांना महिनो-न-महिने बँकेच्या चकरा माराव्या लागत असतील, तर ही बाब गंभीर असल्याची भावना खातेदारांनी व्यक्त केली. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून संबंधित बँक प्रशासनावर कारवाई करावी आणि आपल्याला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी शेतकरी आणि खातेदारांकडून होत आहे. आता या प्रकरणात बँक प्रशासन आणि संबंधित यंत्रणा काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### बडतर्फ पोलीस उपनिरीक्षकानेच

रचल्याची माहिती समोर आली. या कटात अंकुश चव्हाण आणि श्रवण चव्हाण यांनाही सहभागी करून घेण्यात आले. ठरलेल्या कटानुसार, चारही संशयित आरोपींनी भोकर येथील स्टेट बँकेच्या शाखेत प्रवेश केला. बंदुकीचा धाक दाखवत गोळीबार केला आणि बँकेतील २७ किलो सोने तसेच साडेबारा लाख रुपयांची रोकड घेऊन पळ काढला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. मात्र, बँक कर्मचाऱ्यांनी दाखवलेली सतर्कता, ग्रामस्थांनी दाखवलेले धाडस आणि पोलिसांनी तातडीने केलेली नाकाबंदी यामुळे आरोपींचा पळून जाण्याचा प्रयत्न फसला.

**तत्परतेमुळे मुद्देमालासह अटक**

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी संशयित आरोपींचा पाठलाग करून त्यांना गावाबाहेर जाण्यापूर्वीच ताब्यात घेतले. त्यांच्याकडून दरोड्यातील संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. या प्रकरणाचा तातडीने तपास करून चारही संशयित आरोपींना मुद्देमालासह अटक केल्याबद्दल संबंधित पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना बक्षीस देण्यात आले. दरम्यान, कायद्याचे रक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या पोलीस दलातील अधिकाऱ्यानेच तुरुंगातून बसून बँक दरोड्याचा कट रचल्याच्या प्रकारामुळे पोलीस विभागात खळबळ उडाली आहे.

### आदिवासी गुर्जर बंजारांच्या लोकपंरपरा

जिल्हाध्यक्ष संदीप चौधरी, रमाकांत पाटील यांच्यासह ऋषिका गावीत,दीपक कुलकर्णी, संतोष पाटील, गौरीशंकर धुमाळ आणि अभिजित खेडकर आदी स्वागत व आयोजनाची जबाबदारी सांभाळत आहेत.प्रा निंबाजीराव बागुल,सुलभा महिरे, सविता पटेल, प्रा. डॉ.माधव कदम, डॉ.विवेक वैद्य, डॉ श्रीराम दाउतखाने, प्रा लांडगे, राहुल कुलकर्णी, राहुल खेडकर, क्षमा वसईकर,रणजित राजपूत रोहन नटावदकर आदींसह साहित्यप्रेमी परिश्रम घेत आहेत. नंदुरबार जिल्ह्यातील लोकसाहित्यिक, कवी, लेखक, साहित्यप्रेमी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संमेलनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### आ. अमरिशभाई पटेलाच्या उपस्थितीत

पाटील ऊर्फ भुरा पाटील यांनी केले होते. भुरा पाटील यांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि नियोजनामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष योगेंद्रसिंग सिसोदिया, भाजपा माजी तालुकाध्यक्ष किशोर माळी, वाघाडी माजी सरपंच ड. बाबा पाटील, भाजपा ग्रामीण उपाध्यक्ष जयसिंग राणा, शिंगावे तसेच कॉलनी परिसरातील नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात मराठी भावगीते, भक्तिगीते तसेच हिंदीतील जुन्या आणि नवीन गीतांच्या बहारदार सादरीकरणाने उपस्थितांना संगीताची मेजवानी मिळाली. कार्यक्रमाची प्रस्तावना राजेंद्र काशिराम पाटील यांनी तर रमाकांत पाटील यांनी आभार प्रदर्शन केले. सूत्रसंचालन प्रविण शर्मा यांनी केले. नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि आयोजकांच्या नियोजनामुळे कोजागिरी पौर्णिमेचा हा सोहळा संस्मरणीय ठरला.

## पान १ वरुन

### निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमारांचा मतचोरीचा कट

कृत्याची कायदेशीर चौकशी होईल आणि त्यांना तुरुंगात जावे लागेल. ज्ञानेशकुमार यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर १३.५ कोटी मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. प्रत्येक सात ७ मतदारांमागे एक मतदाराचे नाव वगळण्यात आल्याचे सांगत त्यांनी २०२४ ची निवडणूक अवैध असल्याचा आरोप केला. यासाठी निवडणूक आयोगाच्या आकडेवारीचा त्यांनी आधार घेतला. हे आंदोलन कोणत्याही एका पक्षासाठी किंवा नेत्यासाठी नाही. हे संविधान, लोकशाही आणि देशाच्या जनतेचा आवाज वाचवण्यासाठी आहे. आम्ही द्वेषाचे राजकारण करत नाही, तर प्रेमाचा संदेश देतो, असे राहुल गांधी म्हणाले.

**मैदान पूर्ण क्षमतेने भरले, परिसरात गर्दी**

दिल्ली पोलिसांच्या माहितीनुसार, रामलीला मैदानाची एकूण सुरक्षित बैठक क्षमता सुमारे ४५ ते पन्नास हजार आहे. आज हे मैदान पूर्ण क्षमतेने भरले. मैदानावर जादा नसल्याने नागरिक बाहेर पडून आजूबाजूंच्या रस्त्यांवर थांबले. इंडिया आघाडीच्या नेत्यांनी या रॅलीस देशभरातून १० लाख नागरिक तथा समर्थक आणण्याचे लक्ष्य ठेवले होते. मैदानासह मिंटो रोड, कॅनॉट प्लेस परिसर गर्दीने व्यापला गेला होता. दिल्ली पोलिसांनी इडिया आघाडी आणि सत्ताधाऱ्यांची रॅली आणि कायदा सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पहाता १० हजारावर पोलिस आणि निमलष्करी दलाचे जवान तैनात केले होते.

**खरगेंचा सरकारला इशारा**

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्र सरकारने मतदारांच्या हक्कांवर गदा आणल्याचा आरोप केला. मोदी सरकार लोकांना विभागण्याचे काम करत आहे. मतदार कोण असावा, हेही आता सरकार ठरवू पाहत आहे. ईडी आणि सीबीआयसारख्या यंत्रणांचा वापर करून आम्हांला घाबरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र आम्ही घाबरणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

**निवडणूक प्रक्रियेवरच प्रश्न - ममता**

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी लोकशाही आणि मतदारांच्या अधिकारांवर हल्ला होत असल्याचा आरोप केला. आम्ही हरलेलो नाही, तर आम्हांला हरवण्यात आले आहे. आमच्या बंगालची लूट झाली आहे. केवळ मतेच नाही, तर मतमोजणीही लुटण्यात आली. आम्ही माघार घेणार नाही. लोकशाही वाचवण्यासाठी शेवटपर्यंत लढू, असे त्या म्हणाल्या.

**यादवांचा उत्तरप्रदेश सरकारवर निशाणा**

समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी उत्तर प्रदेशातील राजकारणाचा उल्लेख करत २०२७ च्या विधानसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना पराभवाला सामोरे जावे लागेल, असा दावा केला. जे एकेकाळी उत्तरप्रदेशातून आले होते, ते आता उत्तर प्रदेशातूनच परत जातील. उत्तर प्रदेशातील जनता ज्यांचे स्वागत करते, त्यांना योग्य वेळी निरोपही देते. त्यांचे २०२७ मध्ये जाणे निश्चित आहे, असे अखिलेश म्हणाले. उत्तर प्रदेशातील एक कोटी वीस लाख हिंदू मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आल्याचा आरोप करत त्यांनी प्रश्न केला की, हे मतदार पाकिस्तानी आहेत का? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानानुसार सर्व नागरिक समान असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**तेजस्वी यादवांचा महाभारताचा दाखला**

राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधताना रामलीला मैदानावर मत चोरांविरोधात महाभारत सुरू असल्याचे म्हटले. सामान्यतः रामलीला मैदानावर रामलीला होते. मात्र, आज आम्ही मतचोरांविरोधात महाभारत आयोजित केले आहे. आम्हांला अन्यायाविरोधात संघर्ष करायचा आहे, असे ते म्हणाले. त्यांनी शकुनीच्या फाशांचा दाखला देत निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

**अब्दुल्ला आणि मेहबूबा मुफ्तींची टीका**

नॅशनल कॉन्फरन्सचे नेते फारुख अब्दुल्ला यांनी मुस्लिमांना पाकिस्तानी ठरवण्याच्या प्रवृत्तीवर टीका केली. आम्ही भारतासाठी रक्त सांडले आहे आणि यापुढेही देशासाठी उभे राहू. आम्हाला याच देशात राहायचे आहे, असे ते म्हणाले. पीडीपीच्या नेत्या मेहबूबा मुफ्ती यांनी देशातील वाढत्या आर्थिक विषमतेवर, बेरोजगारीवर आणि अग्निवीर योजनेवर टीका केली. देशातील संपत्ती मोजक्या उद्योगपतींच्या हातात जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

**दुसऱ्या स्वातंत्र्यलढ्याची लढाई**

सीपीएमचे सरचिटणीस एफ. ए. बेबी यांनी या आंदोलनाला दुसऱ्या स्वातंत्र्य लढ्याची सुरुवात, असे संबोधले. देशाला फॅसिस्ट विचारसरणीपासून वाचवण्यासाठी विरोधी पक्षांनी एकजुटीने संघर्ष करण्याचे आवाहन त्यांनी केले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.



### स्व. प्रेमचंद जाधवांच्या पुण्यतिथी निमित्त मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन

**शहादा, दि.१(प्रतिनिधी)- येथील वसंतराव नाईक शैक्षणिक संकुलात सातपुडा शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कर्मसाक्षी स्व.प्रेमचंद जाधव यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे समन्वयक संजय राजपूत होते.**

यावेळी माजी प्राचार्य जीवन जयस्वाल, माजी मुख्याध्यापक आर.जे.हरेज, माजी मुख्याध्यापक महेंद्र मोरे, माजी मुख्याध्यापिका एस.झेड.सैय्यद, नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दुर्गो धन राठोड, सोनामाई महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही. एस.पाटील, नाईक विद्यालयाचे मुख्याध्यापक जे.एम.पाटील, शारदा कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापक आर.एफ.पाटील, उपमुख्याध्यापक जे.बी.पवार, उपप्राचार्य गणेश सोनवणे, उपप्राचार्य एस.बी.पवार, पर्यवेक्षक ए.ए.खान, पर्यवेक्षक अनिल खेडकर, पर्यवेक्षक पवार उपस्थित होते. प्रथम उपस्थित सर्व मान्यवरांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी स्व.प्रेमचंद जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

यावेळी बोलताना समन्वयक संजय राजपूत यांनी स्व.कर्मसाक्षी प्रेमचंद जाधव यांनी दिलेली शिकवण संस्कार सर्वांनी आचरणात आणावे. विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त हित जोपासण्याच्या प्रयत्न करावा. विद्यार्थी हा केंद्रबिंदू असला पाहिजे. संस्था व शैक्षणिक संकुलासाठी शिक्षकांनी जास्तीत जास्त वेळ देण्याचा प्रयत्न करावा. स्व.प्रेमचंद जाधव यांनी निर्माण केलेल्या शैक्षणिक वटवृक्षाची जोपासना करावी असे आव्हान केले. याव्यतिरिक्त प्रा.अशोक वळवी, प्रा.आय.बी. पिंजारी यांनी देखील मनोगत व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मुंजाळ यांनी करून आभार व्यक्त केला. कार्यक्रमाला शिक्षक-प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन वार्ता

### पुंडलिक बाविस्कर



लामकानी दि.१- धुळे तालुक्यातील लामकानी येथील कै .पुंडलिक बंडू बाविस्कर (वय ८२) यांचे रविवार दि.०१ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ६:१५ वा. वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.ते माजी ग्रामपंचायत सदस्य सुनील बाविस्कर ,येथील जोगेश्वरी प्रोव्हिजन या होलसेल किराणा दुकानाचे संचालक नरेंद्र बाविस्कर, संदिप बाविस्कर यांचे वडील होते,तर येथील इंग्लिश स्कुल लामकानी चे मुख्याध्यापक एस.डी. बाविस्कर सर यांचे काका होते.

### शालिग्राम पाटील



धुळे दि.१: येथील सेवादास नगर मधील रहिवासी शालिग्राम बाजीराव पाटील (देवरे) यांचे वृद्धापकाळाने आज दुपारी दीडला निधन झाले.

त्यांची अंत्ययात्रा उद्या (ता.२) सकाळी दहाला प्लॉट क्रमांक , सेवादास नगर, चितोड रोड येथील निवासस्थानापासून निघेल. चितोड रोड परिसरातील अमरधाममध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार होतील. वाळू वाहतूकदार संघटनेचे धुळे जिल्हाध्यक्ष गोरखशेठ पाटील, कुणबी पाटील एकत्रीकरण संस्थेचे धुळे जिल्हाध्यक्ष सुरेश (बापू) पाटील, दिलीप पाटील यांचे ते वडील, व्यावसायिक ज्ञानेश्वर पाटील यांचे काका, इंजिनीयर संदेश देवरे यांच्या आजोबा होत.

## पान १ वरुन

### दिवाळी प्रकाशाचा आणि आनंदाचा क्षण

फुप्फुसे, हृदय आणि त्वचेच्या आरोग्यावर होऊ शकतो. फटाक्यांच्या निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात कागद वापरला जात असल्याने वृक्षतोड आणि कचऱ्याच्या समस्येतही भर पडते.

फटाक्यांच्या कानठळ्या बसविणाऱ्या आवाजामुळे ध्वनिप्रदूषण होते. लहान मुले, वृद्ध, रुग्ण, गर्भवती महिला, विद्यार्थी तसेच पशुपक्ष्यांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. फटाके फोडताना होणाऱ्या अपघातांमध्ये अनेक नागरिक जखमी होतात, तर आगीच्या घटनांमुळे मालमत्तेचे नुकसान होते. फटाके तयार करणाऱ्या कारखान्यांमध्ये बालमजुरांचा वापर होत असल्याने फटाक्यांची खरेदी अप्रत्यक्षपणे बालमजुरीला प्रोत्साहन देणारी ठरू शकते.

समितीच्या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना फटाक्यांचे दुष्परिणाम समजावून सांगून फटाके न फोडण्याची किंवा मागील वर्षाच्या तुलनेत फटाक्यांवरील खर्च कमी करण्याची प्रतिज्ञा दिली जाते. फटाक्यांवर खर्च होणाऱ्या पैशांतून आवडीची पुस्तके, खेळणी खरेदी करणे, किल्ले उभारणे तसेच गरीब व गरजू विद्यार्थ्यांना भेटवस्तू देणे असे पर्याय सुचविले जातात.

समितीचा फटाक्यांना विरोध केवळ दिवाळीपुरता मर्यादित नसून लग्नसमारंभ, वाढदिवस, मिरवणुका, महापुरुषांच्या जयंती, निवडणुकीतील विजय, क्रीडा स्पर्धांतील यश, नववर्षाचे स्वागत तसेच विविध धर्मांच्या सण-उत्सवांमध्येही फटाके वाजवू नयेत, असे आवाहन करण्यात आले आहे. फटाक्यांवर होणारा खर्च गरजू व्यक्तींना मदत करण्यासाठी वापरावा, असेही समितीने म्हटले आहे.

पर्यावरण स्वच्छ आणि निरोगी ठेवून दिवाळीचा खरा आनंद अनुभवण्यासाठी नागरिकांनी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करावी, असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केले आहे.

### पुण्याहून धुळे व नंदुरबारसाठी ज्यादा

बससेवेबाबत काही अडचण उद्भवल्यास प्रवाशांनी संबंधित बसस्थानकांवरील नियुक्त पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. खान्देशातील प्रवाशांचा प्रवास अधिक सोयीस्कर, सुरक्षित आणि नियोजनबद्ध व्हावा, या उद्देशाने धुळे विभागाने हा पुढाकार घेतला असून प्रवाशांनी योग्य पर्याय निवडून आरक्षण करावे आणि एस.टी. महामंडळाच्या या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन धुळे विभागातर्फे करण्यात आले आहे.

### संत कबीर दुसऱ्या हिंदी अवृत्तीचे प्रकाशन संपन्न

यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी अखिल भारतीय अल्पसंख्याक कर्मचारी फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय मोहिते, मूलनिवासी सभ्यता संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मंगलचंद्र हांसदा,धिरज गणविर,सुरेंदर सिंह, कुमार विजय द्रोणी,प्रा.डॉ.प्रभाकर निसर्गंध,सुजीत सोनावळे, डॉ.मोहन मोरे, विद्या मोरे, ऍड.निर्मला वसावे, रूक्मिणी लोखंडे, शोभा लोखंडे उपस्थित होते.प्रास्ताविक हिम्मत वैद्य,तर सूत्रसंचालन अजयकुमार मांझी, यांनी केले.शेवटी आभारप्रदर्शन रश्मी डोंगरे यांनी केले.रसिक, साहित्यिक, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

### देवरे अभियांत्रिकी मधे आय.इ.टी.ई

मा राजेश ठाकरे व चैताली पाटील व सहकारी प्रशिक्षक म्हणून उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी फॅकल्टी कोऑर्डिनेटर म्हणून प्रा डॉ पल्लवी साळुंके व प्रा डॉ दिपाली भामरे यांनी काम पाहिले. विद्यार्थी समन्वयक म्हणून मयंक दीपक पिंगळे, वैभव अशोक राठोड आणि कुणाल शरद पाटील, तर विद्यार्थी सचिव म्हणून हर्षल अरुण देसले यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. आय ई टी ई स्टुडंट्स फोरम च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक जिज्ञासा, नेतृत्वगुण, संघभावना आणि नाविन्यपूर्ण विचारसरणी विकसित होण्यास मदत होणार आहे.भविष्यात विविध तांत्रिक उपक्रम, कार्यशाळा, स्पर्धा आणि प्रकल्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा बाबासाहेब कुणाल पाटील, महाविद्यालयाचे अध्यक्ष मा दादा साहेब सुभाष देवरे, उद्योजक मा विलास देवरे यांच्या प्रमुख मार्गदर्शनात इलेक्ट्रॉनिक्स टेली कम्युनिकेशन्स विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी या कार्यशाळेचे उत्तम संयोजन केले.


**पाहिजेत**
सोफा कारागीर दुकानात माल जोडणे, सिलाई काम करणारे लेडीज / जेन्टस पाहिजेत. भरपूर पगार.
-: संपर्क :-
फो नं.9423941247

**श्री अग्रसेन इंडस्ट्रीज**
E.58, MIDC अवधान, धुळे
**पाहिजेत**
१) प्रॉडक्शन मॅनेजर : पद : १
पात्रता : I. T. I. २ वर्ष अनुभव
२) अकौन्टंट : पद : १
पात्रता : B.Com. Tally, Excel
अनुभव २ वर्ष
३) ऑफिस बॉय : पद : १
पात्रता : १० वी पास
भेटा:- Contact :- Mob 7507239218

**स्वास दिवाळी निमित्त**
**वीर सावरकर अपार्टमेंट**
फ्लॅट बुकिंग व भाड्याने देणे आहे.
फ्लॅट एरिया : 1 BHK - 1000 स्के.फुट
2 BHK - 1200 स्के.फुट,
3 BHK - 1350 स्के.फुट
बुकिंगसाठी संपर्क
मालक तात्यासाहेब रघुनाथ भगवान चौधरी
मो. 9405466937
इंजि.राजेंद्र के.खैरनार (बी.ई.सिव्हिल)
मो. 9422789513
पत्ता : वाणी मंगल कार्यालयाजवळ, भिडेबाग देवपूर, धुळे

**पाहिजेत**
दुकानात कामासाठी मुले/मुली/महिला पाहिजेत. कॉम्प्युटर ऑपरेटर/ अकौंउन्टंट/सेल्समन बाहेर गावांसाठी मदतनीस पाहिजेत
-: संपर्क :-
संजय मेडिकल्स
गल्ली नं. २, धुळे

**पाहिजेत**
दुकान कामाकरीता ऑर्डरसाठी मुलगा/ माणूस त्वरीत पाहिजे. पार्ट टाईम/फुलटाईम
किसान केंद्र
गांधी पुतळा, धुळे
फो नं.9730125577

**पाहिजेत**
१) ऑफिस बॉय : १०
२) सेल्समन : ०५
३) हेल्पर : १०
पत्ता :
अभिराम लाईटिंग ॲण्ड डेकोर
डिसान फॅक्टरी समोर, अवधान मालेगांव रोड, धुळे

**पाहिजे**
कमी रनिंग असलेल्या गाडीवर निर्वसनी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे.
भेटा वेळ- दु १२ ते ३
-: संपर्क :-
9613790909

**पाहिजेत**
धुळे एस.टी.स्टँडवरील पे अँड पार्किंगसाठी दुचाकी वाहने लावण्यासाठी ८ तास डयुटीसाठी होतकरू कर्मचारी त्वरीत पाहिजे.
आकर्षक पगार
-: संपर्क :-
9765229022

**पाहिजेत**
होलसेल मेडिकलमध्ये कामासाठी मुले पाहिजेत
१) सेल्समन आणि कलेक्शन्स बाहेर गावी
२) दुकान काम हेल्पर
अनुभव असल्यास प्राधान्य
-:संपर्क :-
8668932019

**शेतजमिन विकणे आहे**
दहिवद ता.शिरपूर शिवारातील गोल्ड फॅक्टरीच्या मागील बाजूस असलेली गट नं.२५४/२ व २५४/३ एकूण क्षेत्रफळ २ हे. ७१ आर विकणे आहे.
संपर्क :- दिलीप अग्रवाल (7020562799)
अरूण अग्रवाल (9422215551)

**फ्लॅट विकणे आहे**
चंपाबाग साक्री रोड धुळे येथील पहिल्या मजल्यावरील 1 BHK Flat विकणे आहे.
-: संपर्क :-
9421534949
7498317318

**आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...**
atomberg "Why not?"

क्या आप जानते हैं
इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं ?
इंडक्शन मोटर वह मोटर है,जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमे 75 वॉट बिजली की खपत होती हैं.
एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती हैं. इनसे हर साल ₹1500 तक की बचत होती है.
इसका मतलब यह है की हमारे पंखे 3* साल में फ्री हो जाते हैं.
ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.
इनमें रेग्युलेटर की जरुरत नहीं होती है !
SAVES UP TO ₹1500 IN A YEAR
100% PURE COPPER MOTOR FOR A LONGER LIFE
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०